बुधवार, १४ डिसेंबर २०२२
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -११९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 14 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-119 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# ...न झालेल्या पाणलोट योजनेचा गावकऱ्यांना 'दिलासा' ?

## १२ गावांतील २ कोटींच्या सिंचनाचे पाणी मुरले कुठे? अशासकीय एनजीओचा प्रताप

आधुनिक केसरी न्यूज

संपूर्ण ग्रामपंचायतींना केंद्रबिंदू मानून राज्यामध्ये निर्मल भारत अभियान व जलस्वराज्य पाणी पुरवठा योजनेनंतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना राबवण्याचा निर्णय झाला. व्यवस्थापन प्रकल्पाची व्याप्ती वाढवून ग्रामस्थांचे जनजीवन व्यापक करण्याचा उद्देश यात होता. सन २००९ पासून ३३ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली होती. दरम्यान काही अशासकीय एनजीओने याचा पुरता बट्ट्याबोळ केला आहे.

**सिंचनाचा बट्ट्याबोळ** भाग-१

मराठवाड्यात सिंचनाच्या नावाखाली कोट्यवधींचा घोटाळा झाला आहे. ही सर्व बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे. नेमका काय आहे हा घोटाळा याचा आधुनिक केसरीने तळापर्यंत जाऊन तपास केला असता अनेक बाबींचा पर्दाफाश झाला आहे. (सविस्तर पान-3 )



# ना जातीसाठी ना धर्मासाठी! आम्ही रस्त्यावर शिवरायांसाठी!!

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : 'ना जातीसाठी ना धर्मासाठी, आम्ही उतरलो रस्त्यावर शिवरायांसाठी' असे फलक आणि भगवा, हिरवा, निळा असे सर्वच धर्मांचे झेंड हातात घेत सर्वपक्षिय व संघटनांच्या वतीने बुधवारी शहरात महापुरुषांबद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांच्या विरोधात विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला पुणेकरांनी जबरदस्त प्रतिसाद दिला.**

महाराष्ट्राचे राज्यपाल कोश्यारी आणि भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांना तत्काळ पदावरून दूर करावे. तसेच भाजपने महाराष्ट्राची माफी मागावी, या मागणीसाठी सर्व पक्षियांच्या वतीने पुणे बंदची हाक देण्यात आली होती. सकाळी डेक्कन जिमखाना येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात राजकीय पक्षांबरोबर बावीसहून अधिक स्वयंसेवी संस्था आणि संघटना सहभागी झाल्या होत्या. तरुणांबरोबरच महिलांचा लक्षणीय सहभाग होता. हातावर आणि डोक्यावर काळ्या पट्ट्या, प्रत्येक धर्माचे झेंडे आणि मोर्चाच्या पुढील बाजूस छत्रपती शिवराय यांचा अश्वारूढ पुतळा अशा शिस्तीमध्ये निघालेल्या मोर्चा लालमहालापर्यंत आला. तेथे मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. मोर्चाच्या मार्गावर चौकाचौकात शिवाजी महाराजांचे पुतळे ठेवण्यात आले होते. त्याला पुष्पहार घाऊन मोर्चा हळूहळू पुढे सरकत होता. तर मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांसाठी पाणी आणि चहाची व्यवस्था काही व्यापारी संस्थांच्या वतीने करण्यात आली होती. मुस्लिम, ख्रिश्चन, शिख यांच्यासह सर्वधर्मिय नागरिक मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. पुणे शहर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), आम आदमी, पुणे शहर व्यापारी संघटना, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड आडते असोसिएशन, संभागी ब्रिगेड, मुलनिवासी मुस्लिम मंच, राष्ट्रसेवा समूह महाराष्ट्र, अखिल भारतीय बहुजनसेना, स्वराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजी महाराज सेवा समिती, पदवीधर विद्यार्थी संघ, श्रीमंती घोरपडे सरकार प्रतिष्ठान, स्वराज्य भूमी प्रतिष्ठान, शिवनेरी रिक्षा संघटना, रिपब्लिकन युवा मोर्चा महाराष्ट्र, युवक क्रांती दल, शिवसंकल्प संस्था, जातीय लोकाधिकार संघटना महाराष्ट्र, पुणे शहर जिल्हा मातंग समाज, लहूजी समता परिषद, अद्वैत क्रीडा संघ, रिजनल ख्रिश्चन सोसायटी. मराठा टायगर फोर्स, राजश्री शाहू महाराज सोशल फाउंडेशन, मराठा सेवक समिती, रिपब्लिकन सेना, आजाद समाज पार्टी, जमियते, उलमाए हिंद, दलित पँथर ऑफ इंडिया आदी संघटनांचा सहभाग होता.

### राज्यपालांवर नुपूर शर्मासारखी तत्काळ कारवाई करा ; उदयनराजे



नुपूर शर्माच्या बाबतीत तात्काळ कारवाई करण्यात आली तशीच कारवाई राज्यपालांवर करण्यात यावी, अशी मागणी भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी केली आहे . शेकडो वर्षानंतर छत्रपची शिवाजी महाराज यांच्याबद्दलचा आदर अजूनही बघायला मिळतो . काहीही कारण नसताना शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्यं करतात . त्यांच्या सन्मान झाला पाहिजे हे सांगण्याची वेळ आली आहे . यापेक्षा मोठी शोकांतिका नाही . त्यामुळे राज्यपालांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे .

## खदखद



बाबूराव पाटील, भोकर

आधुनिक केसरी

*अलीकडे माणसांना दुःखाचे गाठोडे,*
*वेदनेचे शल्य आणि उरावर येऊन पडलेली खदखद*
*वास्तवात जाळीत आहे...,*
*आपलं जगणं, आपली माती सोडून*
*का जावं लागत आहे माणसांना दूरदेशी ?*
*माणसं अंधारात जगतात आणि*
*अंधारातच मरतात तेव्हा गावाच्या, प्रदेशाच्या सीमा*
*मगरीचे अश्रू ढाळीत*
*मूग गिळून गप्प राहतात...*
*तेव्हा संपूर्ण गाव विकणे आहे ? आम्हाला या राज्यात*
*राहणे नको ?*
*अशा ठिणग्यांची नोंद आपण घेणार*
*आहोत काय ?*
*अशातच, सभोवताली पेटलेला*
*वणवा विव्हळतोय केव्हाचा,*
*त्याच्याकडे कुणाचेच लक्ष जात नाही*
*हे पाहून 'त्या' स्वप्नांची वाट पाहत मरता मरता*
*जगतच राहू ?*
*अशी खदखद मात्र मातीतच मुक्काम करून राहिली*
*आहे..!*

बाळासाहेब जोगदंड
औरंगाबाद मो. 9423051246

## आ. राजन साळवींची एसीबीकडून चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांची एसीबी अर्थात 'अँटी करप्शन ब्युरो'कडून चौकशी करण्यात आली आहे. बेकायदेशीर मालमत्तेप्रकरणी साळवी यांची चौकशी झाल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी नोटीस बजावल्यानंतर राजन साळवी चौकशीसाठी अलिबागच्या दिशेने रवाना झाले.

# मारुतीचे मंदिर नसणाऱ्या गावात होते दैत्याची आराधना


## अहमदनगर जिल्ह्यात रामायणकालीन आगळंवेगळं गाव




आधुनिक केसरी न्यूज

जयप्रकाश बागडे

शेवगाव : अहमदनगर जिल्ह्यातील रामायण कालीन काशी केदारेश्वर हा परिसर दंडकारण्य म्हणून प्रचलित आहे आणि या परिसरात ऋषीमुनींसह दैत्यांचेही वास्तव्य असल्याने हनुमान व निंबादैत्याचे घनघोर युद्धात प्रभू रामचंद्राने निंबा नावाच्या दैत्याला नांदूर हे गाव जाहागिर म्हणून दिल्याने या गावात हनुमानाची पूजा न करता सबंध गाव दैत्याची आराधना करून महापूजा करतात असे हे महाराष्ट्राच्या नगर जिल्ह्यातील आगळं वेगळं गाव म्हणून प्रसिद्धीस आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या शेवगाव तालुक्यातील रामायण कालीन काशी केदारेश्वर तीर्थक्षेत्राच्या पायथ्याशी व पाथर्डी तालुक्यातील वैकुंठवासी ह.भ.प. महंत भगवानबाबा भगवानगडाच्या पायथ्याशी असणार एक छोटसं दैत्यनांदुर महाराष्ट्रातील आगळवेगळे रामायण काळातील ऐतिहासिक गाव आहे. हा परिसर दंडकारण्य म्हणून ओळखला जात असल्याने रामायण काळामध्ये हनुमान व निंबादैत्य राम भक्त असूनही यांचे घनघोर युद्ध झाले. रामचंद्र प्रभुणे निंबा दैत्य यांना नांदूर हे गाव जहागिरी म्हणून दिले. या गावात दैत्याचे वास्तव्य राहील मारुतीचे वास्तव्य या गावात राहणार नसून मारुतीचे मंदिर व मारुती नावाचा माणूस देखील राहणार नाही, रामायण काळापासून निंबा दैत्य महाराजांची सबंध गाव ग्रामदैवत म्हणून पूजा करतात. महाराष्ट्रातील प्रत्येक गावामध्ये मारुतीचे मंदिर असून दैत्य नांदूर या गावातच मारुतीचे मंदिर नाही असे महाराष्ट्रातील आगळेवेगळे गाव म्हणून प्रसिद्धीला आलेले आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला दैत्याची मोठी यात्रा भरवून महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी महापुजेसह महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवला जात असल्याची माहीती देवस्थानचे अध्यक्ष डॉक्टर सुभाष देशमुख,उपसरपंच भागवत वाघ यांनी दिली तर नुकतेच लग्न झालेले अनिकेत भुजबळ ,कावेरी पालवे भुजबळ,संपतराव भुजबळ ,रेखा भुजबळ ,नंदा पालवे आदींनी महाप्रसादाचा मान घेतला होता.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# फक्त आणि फक्त कृतज्ञता

आधुनिक केसरी



घरात प्रवेश केल्यावर समोरच माझी आवडती पुस्तके दिसली. ती म्हणाली अरे आम्ही आहोत ना. तोवर संध्याकाळची दिवेलागणी झाली होती. मनाच्या गाभाऱ्यातून कुठेतरी हलकेच सूर ऐकू येत होते. अंधाराची खंत तू कशाला करिसी रे गा प्रकाशगीत. मग माझ्या काही वाचक मित्रांना ही घटना जसजशी कळत गेली, तसतसे त्यांचे फोन, मेसेज येऊ लागले. ते म्हणाले, ' सर, तुम्हाला काही होऊच शकत नाही. तुम्ही दररोज लोकांना आनंद वाटता आहात.' त्यांच्या या प्रेमाने मी भारावून गेलो. पु ल देशपांडे, मंगेश पाडगावकर, ग दि माडगूळकर, व पु काळेआदी सारस्वतांना अफाट लोकप्रियता मिळाली, लोकांचे प्रेम या मंडळींनी अनुभवले. मी त्यांच्या तुलनेत कुठेच बसत नाही. तुलना करण्याचा प्रश्नच नाही. सांगण्याचा उद्देश एवढाच की त्या मंडळींना रसिकांकडून जे प्रेम अनुभवायला मिळाले त्याचा किंचित का होईना पण अंश माझ्या वाट्याला आला हे माझे भाग्य. कविवर्य ग दि माडगूळकरांच्या कवितेच्या दोन ओळी देण्याचा मोह या ठिकाणी आवरत नाही. ते म्हणतात ज्ञानियचा वा तुक्याचा तोच माझा वंश आहे माझिया रक्तात थोडा ईश्वराचा अंश आहे. शेवटी पुन्हा एकदा मी सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे कृतज्ञता व्यक्त करतो आहे. कृतज्ञता गाडीची, जिने आमचे संकट स्वतःवर झेलून आमचे प्राण वाचवले. कृतज्ञता डॉ वसुधाताई, डॉ सुहास डोंगरगावकर यांच्याबद्दलची. खरोखरच डोंगरासारखेचे विशाल हृदय असणारी ही माणसे. कृतज्ञता डॉ अजय आणि डॉ सौ निधी यांच्याबद्दल. कोणताही परिचय नसताना एवढे अगत्यपूर्वक उपचार केल्याबद्दल. इंग्रजी शब्दांचा वापर करून सांगायचे झाले तर याठिकाणी ' हॉस्पिटल अँड हॉस्पिटॅलिटी कम्बाइन्ड टुगेदर. ' कृतज्ञता या सगळ्याच प्रसंगात धीर देणाऱ्यांबद्दल. कृतज्ञता तुमच्यासारख्या माझ्या प्रिय वाचकांबद्दल जे माझ्यासमोर नसूनही माझ्यावर प्रेम करतात. सगळ्यात शेवटी कृतज्ञता त्या दयाघनाबद्दल जो चराचरात अस्तित्वात आहे. त्याच्यामुळेच माझेही अस्तित्व आहे. **क्रमशः**



# आनंदी पहाट

## आनंदाच्या गोडीचा कधीही वीट येत नाही

आधुनिक केसरी

आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे.



आधुनिक केसरी

## दिसे चराचरी| पांडुरंग ||

आनंदी आनंद | झाला त्रीभूवनी ||
आत्मानंद मनी | मावेना रे ||१||
माझा मी रमलो | हरिच्या नामात ||
भाव हृदयात | जागा झाला ||२||
नाम तुझे घेता | भक्तीमार्ग जोडी ||
अमृताची गोडी | भजनातह||३||
पूर्व पुण्य माझे | झालो मी भिकारी ||
नामाची शिदोरी | लाभली रे ||४||
ब्रह्मानंद आता | मावेना अंतरी ||
दिसे चराचरी | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरुपण”

आधुनिक केसरी

## भक्ती

नमः सुलोचने तुभ्यं
पाहि मां भक्तवत्सले ।
जगदीश्वरि माये त्वं
कृपाकटाक्षकाङ्क्षिणम् ।।२।।
हे सुलोचने, तुला नमस्कार असो. हे भक्तवत्सले, माझे रक्षण कर.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

आपण आतापर्यंत 14 ब्रम्हाचा अभ्यास केला. आता पुढे समर्थ सांगतात की प्रत्येक ओवीचे शब्दांकन वेगवेगळे आहे. त्याचे शब्दपांडींत्य ओवीनुसार आपण अभ्यासु. शब्दब्रम्ह- स्वस्वरूपाचा साक्षात अनुभव नसुन नुसत्या शब्दांनी ते असे आहे तसे आहे म्हणून सांगणे. स्ववस्तूबद्दल जेथे नुसते शब्दपांडित्य असते ते शब्दब्रम्ह होय. तेथे त्यास्वरूपाचा प्रत्यक्ष अनुभव नसतो. ते मायेच्या कक्षेतच मोडते. शाश्वताचा विचार नसतो.जी सद्वस्तु शब्दाने सांगता येत नाही तिचे वर्णन करण्यास शब्दांची करामत करणे म्हणजे सांगणारा & ऐकणारा दोघेही भ्रमात वावरतात अशाश्वतात शब्दरूपाची करातम करतात. एकाक्षरब्रम्ह-ॐ या एकाक्षराने दर्शित ब्रम् ते मितिकाक्षरब्रम्ह होय. सद्वस्तु विनाशी नाही तशीच अविनाशी नाही. ती नुसती आहे. म्हणून ती एका मोजक्या अक्षराने वर्णन करण योग्य नाही. अक्षर ही मानवी कल्पना असल्याने तेथे शाश्वताचा विचार नसतो. खब्रम्ह--खब्रम्ह म्हणजे आकाश तेच ब्रम्ह होय. असे श्रुती वचन आहे. आकाश शुन्यरूप आहे. ब्रम्हज्ञानाने शुन्य नाहिसे होते. सर्वब्रम्ह--विश्वरूपाने दिसणारे सर्व द्रुष्य नाशवंत आहे. ते विश्वबरोबर लय पावते वेदांत शास्त्रामध्ये या विश्वाच्या प्रलयाचीकल्पना आहे. ब्रम्ह देवाची रात्र सुरू होऊन एकदाका प्रलय मांडला म्हणजे ब्रम्हभुवनापासून तो थेट भूलोकापर्येंत्त सर्व पंचमहाभूतांचा दर्जा कमी कमी होतो. आपल्या डोळ्यांनाजे जे दिसते ते ते खरे ही सर्व खरे ही कल्पना आहे. पण या अनुभवामध्ये जेमूळ अचल स्थिर आहे त्यास चंचलता अस्थिर ता लावली जाते. जे गुणांच्या पलिकडे गुण लावले जातात ज्ञानी पुरुष आकारात असलेल्या वस्तूला शाश्वत ब्रम्ह मानत नाहीत. जे भूत आहे म्हणजे निर्माण झालेले आहे असे पंचभूतात्मक विश्व नाशवंत आहे हे प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे म्हणून हे सर्व ब्रम्हच आहे हेकसे मानय करावे.तात्पर्य काय तर सर्वब्रह नाशवंत आहे. चैतन्यब्रम्ह- ज्या दिसणाऱ्या विश्वाला चैतन्य जिवंत ठेवते ते विश्व खरे नाही. म्हणून खोटेपणाने भासणाऱ्या विश्वाला चालना देणारे चैतन्य त्या विश्वाबरोबर नाश पावते असे म्हणावे लागते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नाम हे रामबाणासारखे आहे

आधुनिक केसरी

बाळांनो ! ज्याच्यावर कुणाची सत्ता चालत नाही, जो कुणापासून लाच घेत नाही, जो जात असताना कुणाला कळत नाही, जो किती गेला आणि किती उरला हे कुणाला सांगता येत नाही, जो गेलेला कधी परत येत नाही, आणि जो भगवंताशिवाय कुणाला भीत नाही, असा हा काळ आजपर्यंत कुणालाही चुकला नाही. ज्या काळाच्या सत्तेने वस्तू आकार धरते, त्याच काळाच्या सत्तेने ती अकस्मात मोडली जाते. सर्व दृष्य वस्तूंना हा नियम लागू आहे. मग आपला देह त्यातून कसा सुटेल ? पण ज्याने भगवंत घट्ट धरून ठेवला, त्याचा देह राहिला किंवा गेला, तरी त्याच्या अवस्थेमध्ये फरक पडला नाही.

यापुढे कुणी सांगणारा भेटो वा न भेटो, तुम्ही सर्वांनी नाम घेतल्याशिवाय राहू नये. जो भगवंताचे नाम घेईल त्याचे राम कल्याण करील. हे माझे सांगणे खरे माना. प्रपंच लक्ष देऊन करा, परंतु त्यामध्ये भगवंताला विसरू नका. हाच माझा अट्टाहास आहे. त्याच्या स्मरणात सर्वांनी आनंदात दिवस घालवा. नाम रामबाणाप्रमाणेच आहे. रामबाण म्हणजे बरोबर काम करणारा बाण; आपल्या लक्ष्यावर अचूक जाणारा तो बाण पुनः परत येऊन भात्यामध्ये बसत असे. रामनाम हे रामाच्या जवळ राहणारे आणि



अचूक रामाकडे नेणारे एक साधन आहे. खरोखर, नामस्मरणाचा अभ्यास एका दृष्टीने फार सोपा आहे. त्याला कोणतीही उपाधी लागत नाही, त्याला काळवेळ नाही, त्याला स्थलाचे आणि देहाच्या अवस्थेचे बंधन नाही. जोपर्यंत जीवाला शुद्ध आहे, तो पर्यंत नाम घेता येते. पण दुसऱ्या दृष्टीने नामस्मरणाचा अभ्यास कठीण आहे. उपाधी असल्याशिवाय आपल्या मनाला चैन पडत नाही. उपाधीमध्ये मन रमते. नामाला स्वतःची अशी चव नाही, म्हणून जरा नामस्मरण केले की त्याचा कंटाळा येतो. यासाठी, नामात रंगणे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. ज्याचे मन नामात रंगू लागले त्याला स्वतःचा विसर पडू लागला असे समजावे. ज्याचे चित्त पूर्णपणे नामात रंगेल तो स्वतःला पूर्णपणे विसरतो, आणि त्याला भगवंताचे दर्शन घडते. नामाची चटक लागली पाहिजे. ती चटक एकदा लागली म्हणजे जगामधली सर्व ऐश्वर्ये तुच्छ वाटतील. हा बाजार मांडून मी बसलो आहे तो त्यासाठीच आहे. प्रत्येकाला नामाची चटक लागावी म्हणून माझा प्रयत्न सारखा चालू आहे. कुणीतरी त्याचा अनुभव घ्यायला तयार व्हा. राम त्याच्या पाठीमागे उभा आहे याची खात्री बाळगा, आणि सर्वांनी मनापासून नाम घ्या, हाच माझा सर्वांना आशिर्वाद. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे , रंगला की नाम सुटणारच नाही

# एनजीओच्या कामाची माहिती ग्रामपंचायतीतून गायब

## 244 सिंचनाच्या कामांचा समावेश; 2 कोटी 18 लाखांचा खर्च, हिशेबाचा पत्ता नाही

आधुनिक केसरी न्यूज

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत राज्यामध्ये जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबविण्याच्या प्रस्तावास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातंर्गत अर्थसहायीत समितीने २ मार्च २०१३ रोजी झालेल्या ५५ व्या बैठकीमध्ये तत्वत: मान्यता दिली. याला २० नोव्हेबर २०१३ रोजी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून पुढील ६ वर्षांसाठी होता. यासाठी जागतिक बँकेकडून २३५ दशलक्ष डॉलर मंजूर करण्यात आले होते. यातील ७० टक्के हिस्सा बँक व ३० टक्के हिस्सा हा राज्य शासन व लोकसहभातून खर्च केला गेला. यातील एक भाग म्हणून मराठवाड्यात जलधर पाणी व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प दिवी सोशिओ टेक्नो कंन्सलटंट, लोकशिक्षण प्रसारक मंडळ आणि दिलासा जन विकास प्रतिष्ठान या अशासकीय एनजीओ मार्फत १४ गावांमध्ये राबविण्यात आला. परंतु माहिती अधिकारात प्राप्त माहितीनुसार या योजनेचा पुरता बट्याबोळ झाला. किती कामे झाली? कुठे झाली? याचे कोणतेही रॅकॉर्ड ग्रामपंचायतींकडे नसल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे जलव्यवस्थापन समितीमध्ये जे अध्यक्ष व सचिव होते, ते देखील गावातील रहिवासी नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

### थेट प्रश्न




संजीव उन्हाळे
संचालक दिलासा जन विकास प्रतिष्ठान

**औरंगाबाद जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी आपल्या संस्थेने पाणीपुरवठा योजनेची कामे केली आहेत का?**
होय, आमच्या संस्थेने जिल्ह्यातील विविध ग्रामीण भागात पाणलोट योजनेअंतर्गत कामे केली आहेत.


**या कामांमध्ये अनियमितता झाल्याचे समोर आले आहे?**
असे काहीही झालेले नाही. आम्ही कुठलाही आर्थिक उद्देश समोर न ठेवता, सामाजिक बांधिलकीतून कामे केली आहेत. तसा आरोप चुकीचा आहे.





**कोणत्या गावात किती खर्च**
लिंगदरी– ३४ लक्ष
धोंडखेडा – २२ लक्ष
खामखेडा – २८ लक्ष
कनकोरा – १९ लक्ष
आडगाव सरक काहोली – २५ लक्ष
लामकाना – २५ लक्ष
हातमाळी – ३५ लक्ष
चारठा – १३ लक्ष
सेलूद – २७ लक्ष
भोगलवाडी – ६ लक्ष
मुरूखेडा – १३ लक्ष
सय्यदपुर – १७ लक्ष
**असे एकूण २ कोटी १८ लक्ष रुपयांची कामे**



1) वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाने ग्रामपंचायतीकडून माहिती घेण्याच्या सूचना दिल्या.



2) प्रत्येक ग्रामपंचायतींना दिलेले पत्र.



3) ग्रामपंचायतीने माहितीच उपलब्ध नसल्याचे दिलेले पत्र.

### जलधर योजनेत या गावाचा होता समावेश

जलधर पाणी व्यवस्थापन योजनेतंर्गत दिलासा या संस्थेमार्फत लिंगदरी, धोंडखेडा, जामखेडा, डोणवाडा, बोरवाडह, बोरवाडी तांडा, कनकोरा, आडगाव सरक माहोली, मारसावळी, फालवाडी, अंजनडोह, नायगव्हाण, लामकाना, हातमाळी, चारठा, सेलूद, भेगलवाडी, मुरुखेडा, आलमपूर, सुलतानपूर, मुर्शदपूर, लाडसावंगी, सय्यदपूर, पिंपळखुटा या गावांची निवड करण्यात आली होती. या ठिकाणी एकूण २४४ विविध सिचंनाचे काम करण्यात आले आहेत.

### ग्रामपंचायतीला माहिती पोहोचलीच नाही

सुमारे २ कोटी १८ लक्ष रुपये यासाठी खर्च करण्यात आला होता. या अनुषंगाने २१ फेब्रुवारी २०११ रोजी मुंबई येथील प्रकल्प व्यवस्थापन 'आरसीपीएमयू' ची बैठक पार पडली. या बैठकीत दिवी सोशिओ टेक्नो कंन्सलटंट, लोकशिक्षण प्रसारक मंडळ आणि दिलासा जनविकास प्रतिष्ठान यांना झालेल्या कामांची माहिती सादर करण्याचे सांगितले होते. तसेच हा अहवाल २३ मार्च २०११ पर्यंत प्रत्येक गावातील जलधर पाणी व्यवस्थापन समिती किंवा ग्रामपंचायतीला सूपूर्द करण्याचे आदेश दिले होते. परंतु नेमके काम काय झाले याचे अहवाल ना व्यवस्थापन समितीला पोहचले ना ग्रामपंचायतीला. नेमके गावात कोणते काम झाले, त्याला किती खर्च आला याची कोणतीच माहिती गावकऱ्यांपर्यंत पोहचलीच नाही.

### अशी आली माहिती समोर

पाणी पुरवठा योजनेचे पाणी नेमके मुरले कुठे? याचा संशय आल्याने माहिती अधिकारात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालयात ७ ऑक्टोंबर २०१४ रोजी माहिती मागवण्यात आली. तेव्हा कार्यालयाने ही माहिती ग्रामपंचायतीतउपलब्ध असून तेथून घ्यावे अशी सूचना केली. यानंतर प्रत्येक गावात माहिती अधिकाराखाली कामाची माहिती मागविण्यात आली, तेव्हा ग्रामपंचयातींनी अशा कोणत्याच कामाची माहिती उपलबध नाही असे स्पष्ट उत्तर दिले.

# कोटक म्युच्युअल फंडकडून एसआयपीचा पर्याय

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** कोटक म्युच्युअल फंड (केएमएफ) ने प्रोत्साहित वित्तीय वर्षाचा अनुभव घेतला. आमचे लक्षकेंद्री उत्पादन धोरण स्वतःच्या पाऊलखुणांचा विस्तार वितरण संपर्क जाळ्यात करण्याविषयी आग्रही राहिले. मालमत्ता वर्गात मालमत्ता अंतर्गत व्यवस्थापन (एयुएम) मध्ये कंपनीने आरोग्यदायक वृद्धीचा अनुभव घेतला. सध्या, कोटक म्युच्युअल फंडकडे २९ लाखांहून अधिक खाती आहेत. ज्या मार्फत गुंतवणूकदार नियमितपणे त्यांच्या म्युच्युअल फंड योजनांत गुंतवणूक करत असतात. कोटक फ्लेक्सीकॅप फंड, कोटक ब्ल्यू चिप, कोटक इमर्जिंग इक्विटी त्याचप्रमाणे कोटक इक्विटी अपॉर्च्यूनिटीज सारखी उत्पादने कोटक म्युच्युअल फंड गुंतवणुकदारांत लोकप्रिय आहेत. कोटक असेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड, हेड- सेल्स, मार्केटींग अँड डिजीटल बिझनेस, मनीष मेहता म्हणाले, "भारतीय म्युच्युअल फंड उद्योग मागील वर्षांपासून झपाट्याने वाढतो आहे. तो देखील गुंतवणुकदार म्हणून, प्रामुख्याने तरुण वर्गात, आजच्या नवीन पिढीला म्युच्युअल फंड परिघातील एसआयपीसारख्या नवीन गुंतवणूक पर्यायांचा शोध घेण्याची इच्छा असते. आम्ही, कोटक म्युच्युअल फंडमध्ये, एसआयपीकरिता सक्रियपणे आरेखन करत असून, मागील काही वर्षांत लोकप्रियता मिळवली आहे. अगदी अलीकडच्या अस्थिर वातावरणात, 'एसआयपी'च्या माध्यमातून नियमित आणि शिस्तशीर गुंतवणुकदारांसाठी संतुलित कार्य केले आहे. गुंतवणुकदारांना आमच्या कोणत्याही चालू योजनेची निवड करून एसआयपी मार्गाने गुंतवणुकीची सुरुवात करणे शक्य आहे. अन्य राबविण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये आमच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या वेबसाईटच लॉन्च करण्यात आले. या संकेतस्थळाच्या माध्यमातून वितरक आणि क्लायंटना पोर्टफोलिओ माहिती पाहता येईल, विविध विषयांवरील ब्लॉग वाचता येतील, आमच्या तज्ज्ञांचे व्हीडिओ पाहता येतील तसेच वेबसाईटवरून खरेदी करण्यासाठी व्यवहार करणे शक्य होईल. आमच्याकडे कोटक बिझनेस हब आहे, आमचे वितरक पोर्टल, जिथे आमच्या भागीदारांना क्लाएंटची माहिती घेता येईल, क्लाएटसह को-ब्रँड मार्केटींग कंटेंट व व्यवसाय वाढीसाठी आवश्यक विश्लेषक साधन शेअर करता येईल. सध्या आमच्याकडे २४००० हून अधिक भागीदार आहेत, ज्यांनी कोटक बिझनेस हब सबस्क्राईब केले आहे. आमचा ऑनलाईन प्रशिक्षण उपक्रम प्रोस्टार्टचे चांगलेच कौतुक झाले आहे. आम्ही वित्तीय व्यवस्थापन (फायनान्शियल प्लॅनिंग) ) आण अन्य दर्जेदार विषयांवर अभ्यासक्रम सुरू केले आहेत. आमचा सर्व कंटेंट आमच्या युट्यूब चॅनल कोटक प्रोस्टार्टवर उपलब्ध आहे.




# वंचित बहुजन आघाडीतर्फे फुलंब्री येथे जोरदार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वंचित बहुजन आघाडीतर्फे फुलंब्री येथे महापुरुषाबद्दल अपशब्द बोलणाऱ्या चंद्रकांत पाटील भगतसिंग कोशारी यांच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी तालुका व फुलंब्री महिला आघाडी यांच्या वतीने महात्मा फुले चौक फुलंब्री येथे जोरदार घोषणाबाजी करून निदर्शने करण्यात आली व भाजप सरकार व आरएसएस यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष राजू प्रधान महिला तालुकाध्यक्ष पुष्पाताई मोरे शहराध्यक्ष भगवान गंगावणे तालुका उपाध्यक्ष काकासाहेब शिरसाट तालुका उपाध्यक्ष प्रल्हाद साळवे शहर तालुका उपाध्यक्ष बबन गायकवाड उपाध्यक्ष बाबासाहेब भादुरी युवा नेते रणजीत वाहुळ जिल्हा उपाध्यक्ष मंगेश गुंजाळ जिल्हा संघटक मनोज जाधव जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र गडवे श्रावण सुरासे माजी सरपंच पंकज वाहूळ युवा नेता बिस्मिल्ला शहा शहर उपाध्यक्ष कलीम शहा आकाश भिमराव गंगावणे रवींद्र भंगरे आकाश गंगावणे काकासाहेब थोरात ऋषिकेश पगडे रमेश भिमसेने राज गंगावणे संतोष भीमसेने युवा तालुकाध्यक्ष विकी शेजुळ गौतम गंगावणे शहर उपाध्यक्ष सचिन पगारे सचिन ढोले सिद्धार्थ पगारे सुमित्रा सुरासे छपाई सोनवणे अनुसया गायकवाड नंदाबाई भोसले शोभा घाटे पार्वताबाई सुरासे कौसाबाई दळवे निलेश प्रधान युवा नेते व असंख्य वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# चीनची घुसखोरी

आधुनिक केसरी

भारतात अरुणाचल प्रदेशातील तवांग सीमेवर भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये ९ डिसेंबरच्या रात्री झटापट झाली होती भारतीय लष्कराच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा जवान जखमी झाले आहेत. त्यांच्यावर गुवाहाटी येथील लष्करी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जवळपास ३०० ते ४०० च्या संख्येने आलेल्या चिनी सैनिकांनाही गंभीर दुखापत झाली आहे. मात्र, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीला या चुकीचा फटका सहन करावा लागला. भारतीय जवानांनी चीनचा डाव हाणून पाडला. आता ९ डिसेंबरच्या चकमकीची माहिती हळूहळू समोर येत आहे. चीनने घुसखोरीची पूर्ण तयारी केली होती, ते केवळ संधीची वाट पाहत असल्याचं विविध अहवालातून समोर येत आहे. ९ डिसेंबर २०२२ रोजी पीएलएने परिस्थिती त्यांच्यासाठी अनुकूल असल्याचं पाहून हा हल्ला केला होता. भारत आणि चीन यांच्यातील सीमा निश्चित नाही. ३००० किलोमीटर लांबीच्या LAC अर्थात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेबाबत स्पष्टतेचा अभाव आहे. ९ आणि १० डिसेंबर २०२२ च्या रात्री ३ च्या सुमारास पूर्व तवांगमधील यांगत्से पॉइंटवर झडप झाली. इंडियन एक्स्प्रेसने लष्करी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार हे ठिकाण अशा 'विवादित क्षेत्रा'पैकी एक आहे ज्यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली आहे. यांगत्से पॉइंटवर एक नाला आहे. याच्या एका बाजूला भारतीय सैनिक आणि दुसऱ्या बाजूला चीनची पीएलए आहे. चीन अशाप्रकारे घुसखोरी करेल अशी कोणतीही कल्पना नव्हती. ९ आणि १० डिसेंबरच्या रात्री जवळपास ३०० ते ४०० चीनी आर्मी नाला पार करुन भारताकडील भागात आले होते. रात्रीच्या अंधारात इथे झटापट झाली, मात्र भारतीय सैनिकांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं. सरकारी सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, PLA ने घुसखोरीची संपूर्ण तयारी केली होती. ते संधीची वाट पाहत होते. ज्याठिकाणी झडप झाली, त्याठिकाणी अतिशय दाट जंगल होतं. चीन त्यांच्या बाजूने सप्लाय लाइन आणि इन्फ्रास्ट्रक्चर तयार करत होतं. मागील काही दिवसांत या भागात बर्फवृष्टी होत होती तसंच दाट ढग होते. यामुळे भारतीय सैनिकांना चीनची ही खेळी ओळखण्यास मोठं आव्हान होतं. चकमकीनंतर, भारतीय लष्कराने रेडिओ फ्रिक्वेन्सी (RF) सिग्नल जियोलोकेशन उपकरणांचा वापर करुन सॅटेलाइट फोटो रि-कन्स्ट्रक्ट केले. सध्या या चित्रांचं विश्लेषण सुरू आहे. तवांगमध्ये झटापट झाल्यानंतर सरकार आणि सेना हार्ट अलर्ट मोडवर आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी उच्चस्तरिय बैठक बोलावली आहे. या बैठकीला तीन सेना प्रमुखांसह संरक्षण आणि परराष्ट्र मंत्रालयाचे उच्च अधिकारी उपस्थित राहणार आहेत. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांना त्यांच्या देशात घेरलं आहे. सीमेवरील तणाव वाढवून सत्तेवर पकड मजबूत करण्याचाही प्रयत्न होऊ शकतो. काही दिवसांपूर्वी भारत आणि अमेरिकेच्या सैन्याने उत्तराखंडमधील औली येथे संयुक्त सराव केला होता. त्यावर चीनचा तीव्र आक्षेप होता. तर दुसरीकडे भारत मानाच्या प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या G-20 समूहाचा अध्यक्ष बनला आहे. यात चीनही सदस्य आहे.

# हाजीर हो !

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555


**आजकालच्या कॉलेजला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याच्या नावे असा कोर्टातल्या सारखा पुकारा करण्याची गरज निर्माण झाली आहे. अगदी ज्युनियर कॉलेज पासून तर पदवी, पदव्युत्तर कॉलेज पर्यंत विद्यार्थ्याची गैर हाजरी हा चिंतेचा विषय झाला आहे.याला कोणतेही कॉलेज,कोणताही कोर्स अपवाद नाही. अगदी इंजिनीअरिंग, मेडिकल, सायन्स सगळीकडे अटेंडनस ची समस्या आहे. जिथे प्रॅक्टिकल असते तिथे गरज म्हणून उपकार केल्यासारखे कसेतरी प्रयोग केले जातात. बाकी जर्नल लिहिणे म्हणजे कॉपी ही पूर्वापार परंपरा आहे.७५टक्के हजेरी हवीच हा नियम फक्त कागदावर. अनेक प्राध्यापकांनी हजेरी घेणे सोडून दिले आहे. प्राचार्यांना पाठवायची हजेरी ही सत्र संपले की उपचार म्हणून पाठवलेला,मॅनेज केलेला डेटा.सरकारी,खाजगी सर्वच संस्थात सारखी परिस्थिती.**

जी मुले १०वी पर्यंत नियमित शाळेत जातात त्यांना कॉलेज हे बिरूद लागले की अचानक पंख फुटतात. कॉलेज मध्ये गेले काय न गेले काय काही फरक पडत नाही हे त्यांना सिनियर कडून कळते. शिवाय लेक्चर नोट्स, गाईड्स हे शिक्षकापेक्षा जास्त जवळचे, उपयोगी हा सल्ला देखील फुकटात मिळालेला. परीक्षेत नेमके काय विचारतात,त्याचे कसे कितपत उत्तर द्यायचे आडाखे, ठोकताळे ठरलेले. ते आपल्या परंपरागत परीक्षा पद्धती मुळे चुकत नाहीत. परीक्षा म्हणजे कसलेही आव्हान नसते आजकाल. थोडाही पेपर कठीण आला की बोंबाबोंब करायला संघटना, स्वयंसिद्ध पुढारी आहेतच मोर्चा न्यायला. निकाल देखील कडक लागण्याची, लावण्याची आजकाल सोय राहिली नाही. तिथेही मोडरेशन नावाची काठी आहेच सोबतीला, तारून न्यायला! त्यामुळेच विद्यार्थी बिनधास्त झाले आहेत.
केव्हा काय करायचे, कसे तारून जायचे हे त्यांना पक्के ठाऊक झाले आहे. खरे तर अनेक अभ्यास क्रमाची फी हजारो,लाखो रुपये असते वर्षाला.खाजगी कॉलेजेस बद्दल तर विचारायलाच नको. पदराला खार लावून, स्वतः अडचणी सहन करून ही भरमसाठ फी भरणारे पालक देखील विद्यार्थ्यांच्या कॉलेज हजेरी बद्दल जागरूक नसतात हे आश्चर्यच!मुलं दिवसभर कॉलेज मध्ये न जाता काय करतात,कुठे जातात याची साधी विचारणा देखील होत नाही. क्वचित विचारले तर तुम्हाला काय कळते अशी उलट उत्तरे मिळतात. काही अपवाद असतीलही या विधानाना.पण बहुतांश परिस्थिती ही चिंताजनकच.
इकडे आपण नवे शैक्षणीक धोरण आणतो. नवे अभ्यासक्रम लावतो. कॉलेज, विद्यापीठाच्यादर्जाच्या, मानांकना ची चिंता करतो, जागतिक स्पर्धेची बात करतो, अन् तिकडे या सर्वाचा जो केंद्र बिंदू, विद्यार्थी,तो असा बेजबाबदार वागतो, या विरोधाभासाला काय म्हणायचे?
हे असे आधीही होते का? तर नाही..मी शिक्षण क्षेत्रात गेली चार दशके कार्यरत आहे. ७०- ८०-९० च्या दशकात ९०टक्के हजेरी असे.अगदी सुटीच्या दिवशी गरज पडल्यास बोलावले तर विद्यार्थी येत.. तेही ९०टक्के! एव्हढेच कशाला,बंद साठी मोर्चा आला की तेव्हढ्यापूर्ते बाहेर जाणार.पण मोर्चा दूर गेला की स्वतःहून क्लास घ्या म्हणून प्राध्यापकाला बोलवायला येणार. हे मी अनुभवले आहे. एकदा तर एक महत्वाचे लेक्चर बंद असताना डिपार्टमेंट LAAबाहेरून कुलूप लावून आत मुलांनी अटेंड केले!आय आय टी सारख्या संस्था रेसिडेन्सीअल असल्याने मुले १००टक्के हजर असत. पण हळू हळू कसे काय कुणास ठाऊक, सारेच बदलत गेले. शेवटच्या वर्षाचे विद्यार्थी तर जॉब हाती असल्याने हजरच नसतात. वर्गात हजर न राहता देखील प्रथम श्रेणीत, प्रविण्यासह उत्तीर्ण होतात.कारण परीक्षेत तेच ते प्रश्न शब्द फेरफार करून विचारले जातात. त्यांची ठराविक तीच ती उत्तरे ठराविक वेळात दिली की गंगेत घोडे न्हाले. विनोद म्हणून सांगायला हरकत नाही.पण माझाच विद्यार्थी देखील असलेला माझा मुलगा म्हणाला होता, तुम्ही मला गेल्या दोन तीन वर्षाचे पेपर द्या,मी यावर्षीचा पेपर काढून देतो! उदाहरण म्हणून त्याने एक पेपर दाखवला. जो दोन वर्षा पूर्वी आलेल्या पेपराची कॉपी होता. फरक हा की त्यात एकदोन प्रिंटिंगच्या चुका होत्या!! एक तर कॉलेजचे म्हणजे वर्गातले वातावरण आता पूर्वी सारखे राहिले नाही. वाचनालयात जायची गरज राहिली नाही.हवी ती इन्फॉर्मेशन (ज्ञाननव्हे)हातातल्या मोबाईल मध्ये मिळते. शिवाय आजकाल तुम्हाला नोकरी देणाऱ्याला तुमची पदवी,तुमचे मार्क्स,तुमचे विद्यापीठ यात काही रस नसतो. तुम्ही त्याच्या कामासाठी लायक आहे की नाही, त्याला हवे ते डिलिव्हर करू शकणार की नाही, त्याचा धंदा वाढवायला तुमचा उपयोग आहे की नाही, तुम्ही टीम मध्ये संवाद साधून एकत्र काम करण्यास योग्य आहात की नाही हेच पहिले जाते.यासाठी वर्गातली हजेरी गरजेची नाही हे मुलांना माहिती झाले आहे.
शिवाय अवती भवती दिसणारी उदाहरणे देखील प्रेरक, नीती न्याय सांभाळणारी,सत्याची कास धरणारी अशी राहिली नाहीत. प्राध्यापक देखील रोल मॉडेल वाटावे असे नाहीत. तेच वाम मार्गाला प्रोत्साहन देणारे आहेत. पाट्या टाकणारे आहेत. ज्यांच्याकडून काही घ्यावे,शिकावे असे किती जण सापडतील देवच जाणे! मुख्य म्हणजे शिक्षण पद्धतीत शिकण्यावर भर नाही. मार्क महत्वाचे. अन् ते कसे मिळवायचे याचे गणित नव्या पिढीला समजून चुकले आहे.हे मार्काचे म्यानुपुलेशन घर बसल्या करता येते.मग वर्गात जायचे कशाला, वेळ वाया घालवायचा कशाला, ही मनोवृत्ती झालीय. त्यात दोष कुणाला द्यायचा,जबाबदार कुणाला धरायचे हा वादाचा विषय,संशोधनाचा विषय म्हणा हवे तर! आपण नवे शैक्षणीक धोरण, नॅक, स्किलबेस्ड एजुकेशन, आऊट पुट बेस्ड पद्धती, ग्लोबल स्पर्धा,वगैरेच्या फक्त गप्पा मारायच्या. वर्कशॉप घ्यायचे.. अहवाल तयार करायचे अन् आकडे दाखवून कुठे किती प्रगती झाली याचे ढोल पिटत बसायचे !विद्यार्थ्यांना नेमके काय हवे, त्यांची मानसिकता कशी आहे, त्यांची आवड निवड कशात आहे, याचा विचार नाही. आम्ही सांगतो ते करा,आम्ही म्हणतो ते, तसेच शिका, परीक्षेत आम्हाला अपेक्षित तेव्हढे, तसेच लिहा हा आमचा आग्रह. एरवी स्वातंत्र्य, स्वायतत्ता याच्या गप्पा मारायच्या. पण मुलांना आवडते ते,हवे तसे,हव्या त्या वेळी शिकण्याचे स्वातंत्र्य आपण देतो का? हा खरा प्रश्न आहे. शिवाय हीच मुले मॉल, रेस्तारांत तासन्तास फिरतात, गप्पा मारतात, पण वर्गातच येत नाहीत,ते का हेही नव्याने शोधायला हवे. शिस्तीच्या बाबतीत तडजोड नको,दबावाला बळी पडणे नको. कारण तुमच्या दुबळे पणाचा देखील ही मुले फायदा घेतात .एक किस्सा सांगतो. तीन दशकांपूर्वी मी उस्मानिया विद्यापीठात विभाग प्रमुख असताना ची गोष्ट. तेव्हा पहिल्या वर्षाचे विद्यार्थी दसऱ्या नंतर घरी निघून जायचे ते दिवाळी नंतर यायचे.. तेही सुट्या नसताना. हा प्रघात अनेक वर्षे चाललेला. तोही फक्त प्रथम वर्ष विद्यार्थीच सुट्या घोषित करून पळायचे. मी हे आपल्या विभागापुरते थांबवायचे ठरवले. त्याला इतर विभागाचा, प्राचार्यांचा पाठिंबा नव्हता. मी सर्व पालकांना कडक शब्दात पत्रे पाठवली. मुले ताबडतोब परतली नाहीत तर त्यांना काढून टाकण्यात येईल अशी तंबी दिली. (मला अधिकार नसतांना!). त्या पत्राचा परिणाम झाला. अनेक पालक भेटायला आलीत.मुले वर्गात परतली. फक्त आमच्या विभागातच हे घडले पण त्याचा परिणाम हाकी पुढील वर्षापासून पूर्ण कॉलेजमध्येच ही प्रथा बंद पडली.प्राचार्यांना कडक धोरण स्वीकारावे लागले. मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची हा प्रश्न असतो. बाकी सारे शक्य असते. आजही चांगले शिस्तीचे प्राध्यापक आहेत. शिस्त पाळणाऱ्या निवडक संस्था आहेत.त्यांचे कार्य अधोरेखित करायलाच हवे. पण हे प्रमाण फार कमी. मागे कॉपी मुक्ती साठी आंदोलन झाले. तसे काहीसे वर्गातल्या हजेरी साठीही झाले पाहिजे. त्यात विद्यार्थी,पालक, प्राध्यापक, संस्था म्यानेजमेंट सर्वाचा सक्रिय सहभाग असला पाहिजे. मग विद्यार्थ्यांना हाजिर हो असे म्हणण्याची वेळ येणार नाही.



# कलार समाजातील युवकांसाठी विकास योजना आणावी

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

**राज्यात दिवसेंदिवस शिक्षणाचा अवाढव्य खर्च वाढलेला आहे. त्याचप्रमाणे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर रोजगाराकरीता युवकांना कडवी झुंज द्यावी लागते यातही त्याला रोजगार मिळेल याची हमी नसते.यामुळे सर्वच समाजात बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढतांना दिसत आहे.राज्यातील गुरव समाजातील युवकांसाठी ओबीसी महामंडळाच्या धर्तीवर संत काशिबा युवा विकास योजना सुरू करून त्यास 50 कोटीचे भागभांडवल देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली यांचे मी मनापासून स्वागत करतो.**



माननीय मुख्यमंत्र्यांनी असाच उपक्रम इतर समाजासाठी राबविला तर राज्यातील प्रत्येक समाजातील युवकांना रोजगाराची संधी अवश्य उपलब्ध होईल यात दुमत नाही. राज्यात कलार समाज मोठ्या प्रमाणात विखुरलेला आहे. त्याचप्रमाणे कलार समाजाची गणना मागासवर्गीय समाजामध्ये होते.त्यामुळे आजही 90 टक्के कलार समाज मागासलेला आहे. त्यामुळे कलार समाजातील परिवारापुढे व युवकांपुढे अनेक समस्यांचा डोंगर उभा असल्याचे दिसून येते. याकरिता राज्य सरकारने इतर समाजाप्रमाणे किंवा गुरव समाजाप्रमाणे ओबीसी महामंडळाच्या धर्तीवर कलार समाजाला मदत करने गरजेचे आहे असे मला वाटते. खरे पहाले तर कलार समाज आत्मनिर्भर होता. परंतु राजकीय पुढाऱ्यांनी वारंवार कलार समाजाचा विश्वासघात केला. मुख्यत्वेकरून कलार समाजाचा पारंपारिक व्यवसाय हा दारू विकने होता आणि अनेक काळपर्यंत पीढोनपीढ्या हा व्यवसाय सुरू होता. परंतु या व्यवसायाचा स्वतंत्र लढ्यात दुष्परिणाम होवू शकतो असे महात्मा गांधी यांच्या लक्षात आले आणि महात्मा गांधींच्या आदेशानुसार दिनांक 24 मे 1934 ला कलार समाजाने आपल्या पारंपारिक व्यवसायावर बहिष्कार टाकला व संपूर्ण कलार समाज स्वतंत्र लढ्यात तुटून पडला.परंतु भारत स्वतंत्र झाल्यानंतर सरकारचे काम होते की कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय परत करने.परंतु त्यावेळच्या राज्य सरकारने विश्वासघात केला आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की कलार समाजाला फक्त 1 टक्के दारूचे परवाने मिळाले बाकी 99 टक्के परवाने राजकीय पुढारी व त्यांच्या आप्तांना देण्यात आले आणि सरकारने दारूच्या व्यवसायाचे "राजकारण"केले व भेसळयुक्त दारू बनवायला सुरुवात झाली. यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाल्याचे आपण पहातो.कलार समाजाने अनेकदा आवाज उचलला की सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी करावी अन्यथा कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय परत करावा. जर महाराष्ट्रात दारू बंदी होत असेल तर कलार समाज त्याचे स्वागतच करेल. त्याचप्रमाणे सरकारने दारू व संपूर्ण नशेली पदार्थ (तंबाखू,खर्रा, सिगारेट,बीडी)यांच्या विरोधात केंद्र व राज्य सरकार नेहमी अभियान छेडत असते व सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेला सांगत असते की कोणतीही नशा घातक आहे याकरिता सरकारने मोठ-मोठी ऑफिसेस खोललेली आहे व अनेक सामाजिक संस्थासुध्दा कार्यरत आहे यामुळे कॅन्सर सारखे रोग होतात असे सांगण्यात येते.मग सरकार या वस्तुच्या विक्रीला प्रथम प्राधान्य का देतात? दारूबंदीचे ऑफिस आणि नशाबंदीचे ऑफिस कशासाठी? असे अनेक प्रश्न उद्‌भवतात.त्यामुळे महाराष्ट्र सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी लागू करावी अन्यथा कलार समाजाला त्याचा पारंपारिक (दारूचा व्यवसाय) 50 टक्के परत करावा. त्याचप्रमाणे गुरव समाजातील युवकांसाठी ज्याप्रमाणे राज्य सरकार भागभांडवल उभारण्यास मदत करीत आहे.त्याचप्रमाणे कलार समाजातील युवकांसाठी राज्य सरकारने भागभांडवल उभारून युवकांच्या उन्नतीसाठी मदत करावी हीच महाराष्ट्र सरकार कडून कलार समाजाला अपेक्षा आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# अरे बाबा, दिल्ली भारताची राजधानी, तर मुंबई..?

आधुनिक केसरी

**या लेखात तुम्हाला भारताची राजधानी कोणती आहे? आणि भारताच्या राजधानीचे नाव काय आहे? हे समजेल, कारण आपणा सर्वांना माहित आहे, की भारतासह जगातील जवळजवळ सर्व देशांची स्वतःची राजधानी आहे, जिथून ते त्यांच्या देशाच्या सुव्यवस्थेची जबाबदारी घेतात. देशांची निर्मिती झाल्यापासून त्यांची केंद्रेही निर्माण होऊ लागली, मग तो आजचा काळ असो किंवा इतिहासातील कोणत्याही शासकाचा काळ असो. प्रत्येक वेळी एखाद्या क्षेत्राचे विशिष्ट ठिकाण राजधानी बनवले जात असे.**

उदाहरणार्थ, राजा महाराजांच्या काळात राज्यकर्ते त्यांच्या शासित क्षेत्राबाहेर एक विशिष्ट जागा त्यांच्या राज्याचे केंद्र म्हणून बनवत असत, जिथे ते त्यांच्या भागात राज्य करत असत. आता काळ बदलला असला तरी काळानुसार शासनाची पद्धतही बदलली आहे. राजधानी इतिहास अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या शब्दांत.

सद्या भारत आणि इतर देशांमध्ये राजा महाराजांच्या जागी राष्ट्रपती आणि पंतप्रधान आले आहेत, तथापि, आता कोणत्याही देशात एखाद्या व्यक्तीला राष्ट्रपती किंवा पंतप्रधान बनण्यासाठी जनतेच्या पाठिंब्याची आवश्यकता असते, ज्या प्रक्रियेला आपण आज निवडणुकीच्या नावाने ओळखतो. आज जरी आपण राजांच्या जगाच्या पलीकडे गेलो असलो तरीही अजूनही काही देश आहेत जिथे राजांची राजवट चालते, जसे की उत्तर कोरिया. जिथे किम जोंग उन दीर्घकाळ राज्य करत आहेत. उत्तर कोरियाची राजधानी प्योंगयांग आहे आणि याच शहरातून किम जोंग उन संपूर्ण उत्तर कोरियावर नियंत्रण ठेवतात. आता तुम्हाला कळले असेल, की राजधानीचे अस्तित्व आजपासून नाही तर बऱ्याच काळापासून टिकून आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की भारताच्या राजधानीचे नाव नवी दिल्ली आहे; जी भारताच्या केंद्रशासित प्रदेशांपैकी एक आहे. दिल्ली ब्रिटिश राजवटीत दि.१ एप्रिल १९१२ रोजी भारताची राजधानी बनली होती. ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवी दिल्ली राजधानी म्हणून स्वीकारली गेली, आता केंद्र सरकारची सर्व मुख्यालये दिल्लीतच आहेत. दिल्लीला भारताची राजधानी बनवण्यामागे अनेक कारणे आहेत, ज्यामध्ये आम्ही तुम्हाला मुख्य कारणे सांगणार आहोत. जर तुम्हाला राजधानीच्या इतिहासाबद्दल थोडीसी माहिती असेल तर तुम्हाला कळेल की ब्रिटीश राजवटीपर्यंत कोलकाता ही भारताची राजधानी होती, परंतु त्यावेळी भारतातील ब्रिटिश राजवटीची जबाबदारी जॉर्ज पंचम वर होती. तेव्हा ब्रिटीश सरकारला वाटले की भारतावर कोलकात्याऐवजी दिल्लीतून चांगले राज्य करता येईल.



ब्रिटिश शासक जॉर्ज पंचम यांनी दि.१२ डिसेंबर १९११ रोजी दिल्लीला राजधानी बनवण्याचा आदेश दिला आणि दि.१ एप्रिल १९१२ रोजी दिल्लीला भारताची राजधानी बनवण्यात आले. तथापि, ते इतके सोपे नव्हते, कारण त्यावेळी दिल्ली हे कोलकात्यासारखे मोठे आणि आधुनिक शहर नव्हते, त्यामुळे ब्रिटीशांना त्यांची राजधानी स्थलांतरित करण्यासाठी बरेच महिने लागले. सुरुवातीला दिल्ली हे शहर होते. परंतु राजधानी झाल्यानंतर येथील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. सद्या दिल्ली हे मुंबईनंतर भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे, याशिवाय ते भारतातील सर्वात जुन्या शहरांपैकी एक आहे. कारण पुरातन वास्तू विभागाला अशा अनेक गोष्टी सापडल्या आहेत, ज्या त्याच्या प्राचीनतेचा पुरावा देतात. म्हणजेच दि.१२ डिसेंबर १९११ रोजी दिल्ली ही भारताची राजधानी करण्यात आली. त्या आधी कोलकाता ही भारताची राजधानी होती.

सन २००१पर्यंत कलकत्ता या नावाने ओळखले जाणारे कोलकाता यात गेल्या दशकात एक नाट्यमय परिवर्तन घडले आहे. आता झोपडपट्टी, निराधार आणि मदर तेरेसा यांच्या प्रेरणेने काम केलेले नाही. कोलकाता भारताची सांस्कृतिक राजधानी म्हणून विकसित झाली आहे. हे एक सजीव पण घनिष्ठ शहर आहे, मोहक आत्मा आणि मोडकळीस आलेल्या इमारती आहेत. याव्यतिरिक्त, कोलकाता भारतातील एकमेव शहर आहे, ज्यामध्ये ट्रॅम कार नेटवर्क असणे आवश्यक आहे, जे जुन्या जगांचे आकर्षण बनवते. मुंबईत स्वतः स्थापन केल्यानंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी १६९०मध्ये कोलकाता येथे पोचली आणि सन १७०२मध्ये फोर्ट विलियमच्या उभारणीपासून तेथे स्वतःसाठी आधार तयार करण्यास सुरुवात केली. सन १७७२ साली कोलकाताला ब्रिटिश भारताची राजधानी घोषित करण्यात आले होते. त्यानंतर ब्रिटीशांनी सन १९११ साली राजधानी ही दिल्लीत स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला. सन १८५०च्या सुमारास कोलकाताची वेगाने औद्योगिक प्रगती झाली; परंतु इंग्रजांच्या डावपेचानंतर तीव्र समस्या उद्भवू लागली. वीज तुटवडा आणि राजकीय कृतीमुळे शहराच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. सुदैवाने सन १९९०च्या दशकातील सरकारच्या सुधारणांमुळे आर्थिक पुनर्प्राप्ती घडली आहे.

सन २०१२च्या आकडेवारीनुसार दिल्लीची लोकसंख्या १.९ कोटी आहे, तर तिचे क्षेत्रफळ १४८४ चौरस किलोमीटर आहे. दिल्ली भारताच्या उत्तरेस स्थित आहे. या केंद्रशासित प्रदेशाच्या अधिकृत भाषा हिंदी आणि इंग्रजी असूनही बहुतेक लोक फक्त हिंदीमध्येच बोलतात. भारताची आर्थिक राजधानी मुंबई आहे. मुंबई हे भारतातील सर्वात मोठे व्यापारी शहर आहे. मुंबईचा भारतातील २५ टक्के उद्योग आणि जीडीपीमध्ये ५ टक्के वाटा आहे. देशाच्या ४० टक्के सागरी व्यापाराव्यतिरिक्त ७० टक्के भांडवली व्यवहार मुंबईतूनच होतात. भारतातील सर्वात श्रीमंत लोक सुमारे ४१,२०० एवढे लक्षाधीश या शहरात राहतात, तर दिल्लीत सुमारे २०,६०० इतके लक्षाधीश आहेत. दिल्ली हे उत्तर भारतातील एक महानगर आहे. राजकीयदृष्ट्या दिल्ली शहर एक केंद्रशासित प्रदेश आहे. या शहराचा कारभार केंद्र सरकार, दिल्ली राज्यशासन आणि तीन महानगर पालिका पाहतात. जी नवी दिल्ली भारतीय प्रजासत्ताकाची राजधानी आहे, ती दिल्ली या महानगरातील एक शहरी भाग आहे. हे राजधानीचे शहर असल्याने येथे देशातील विविध भागातून नागरिक स्थायिक झाले आहेत, त्यामुळे ते एक बहुसांस्कृतिक महानगर बनले आहे. झपाट्याने झालेले शहरीकरण व वेगाने झालेली प्रगती त्यामुळे दिल्लीचा आर्थिक क्षेत्रात विकास झाला आहे. दिल्लीच्या नागरिकांची सरासरी मिळकत ही राष्ट्रीय सरासरीपेक्षा बरीच जास्त आहे. दिल्लीचा पुरातन उल्लेख महाभारत नावाच्या महापुराणात आढळतो. जिथे त्याचा उल्लेख प्राचीन इंद्रप्रस्थ म्हणून केला जातो. महाभारत काळात इंद्रप्रस्थ ही पांडवांची राजधानी होती. पुरातत्व पुराव्यांतील प्रथम पुरावा असे सूचित करतो, की मानव ई.स.पु.दोन हजार वर्षांपूर्वीच दिल्लीत व आसपास होता. मौर्य काळ- ३००इ.स.पू.मध्ये इथल्या शहराचा विकास होऊ लागला. महाराज पृथ्वीराज चौहान यांचे दरबारी कवी चांद बरदाई यांची हिंदी रचना होती. तर पृथ्वीराज रासोमध्ये तोमर राजा अनंगपाल यांचे दिल्लीचे संस्थापक म्हणून वर्णन केले गेले आहे. असे मानले जाते की त्यांनी लाल-कोट बांधला आणि मेहरौलीचा गुप्त कार्पेट लोखंडी खांब दिल्लीला आणला. दिल्लीत तोमरांचा राज्य कालखंड ४०० ते १२०० वर्षाचा आहे. दिल्ली किंवा दिल्लीका शब्दाचा वापर उदयपुरात सापडलेल्या शिलालेखांवर प्रथम सापडला. या शिलालेखांचे वय ११६० वर्षे निश्चित केले गेले. महाराज पृथ्वीराज चौहान हे दिल्लीचे शेवटचे हिंदू सम्राट मानले जातात.

# निसरड्या वाटेवरचा कठडा

आधुनिक केसरी

**तसा तिचा मुलगा राज मोठा झाला होता, पण अवखळ पणामुळे एकटा राहण्याइतका शहाणा पण झाला नव्हता.. 40 पोळ्या घरी करून त्या अनाथाश्रमात, विद्यार्थी गृहात पोहोचवण्याचं काम ती करीत होती. त्याला ती एकट्याला पण घरी ठेवू शकत नव्हती. कारण राजचे बाबा घरातून पैसे घेऊन पळून गेले होते. तिची पूर्ण फसवणूक झाली होती. त्यांचा बराच शोध घेतला. पण व्यर्थ. शेवटी तिच्या लक्षात आलं की धोक्याच्या16 व्या वर्षी आपलं पाऊल निसरड्या वाटेवरून घसरलंय. आता ही लढाई तिला एकटीलाच लढायचीय. ना सासर ना माहेर, सगळेच दरवाजे तिच्यासाठी बंद झाले.**

अंधारात प्रकाशाचा दिवा दिसावा तशा शेजारच्या काकू तिच्या जीवनात आल्या. ओळख होण्याआधी त्या अनोळखी होत्या. पण मग नंतर त्या तिच्या जीवाला जीव देणाऱ्या आई ठरल्या. त्यांनी मदतीचा हात पुढे केला. निराशेच्या भोवऱ्यात सापडलेल्या तिला त्या म्हणाल्या, "भूतकाळ विसर. भूतकाळ आठवत राहशील ना तर भविष्यकाळही बिघडेल. सोन्यासारख्या मुलाकडे बघ आणि त्याचा भविष्यकाळ घडव." आणि राज काकूंच्या देखरेखित वाढू लागला. त्यादिवशी ती खूप थकली होती. पोळ्या लाटून कणिक मळून खांदे दुखत होते. पण सांगणार कुणाला ? राज साठी, पोटासाठी कष्ट करणं भाग होतं. इतक्यात आनंदाने उड्या मारत राज आला बरोबर काकू होत्याच. तृप्तीची ढेकरं देत तो म्हणाला" ए आई ऐक!ऐक ना! अगं! काय मस्त खाऊ केला होता या काकू आजींनी, शिरा मउ मऊ आणि खूपच छान झालाय. मी लगेच फस्त पण केला. आणि हो, बटाट्याची भाजी तर मी चापून खाल्लीये." त्याच्या धबधब्याला आवर घालतांना तिच्यातली शिस्तप्रिय आई जागी झाली आणि त्याला रागवत म्हणाली, "अरे पण एवढा हावरटपणा बरा दिसतो का ? किती त्रास देतोस तू आजीला?"

काकू तिलाचं दटावत म्हणाल्या, "काही हट्ट नाही हं केला त्यानी. उलट गोपाळ कृष्णाला जेवू घातल्याचा आनंदच झालाय मला. आणि हो, आज मंगळवार, माझा अनायसे उपास आहे. सवाष्णीला जेऊ घातल्याचा आनंद मिळेल मला. चल बरं तू पण जेवायला!." आणि मग काकूंनी आग्रहाने तिला आपल्या घरी नेले, प्रेमाने तिला जेवायला वाढले. तृप्त झालेली ती, आणि तिची तृप्तता बघून अन्नदानाचे पुण्य मिळवणाऱ्या काकू समाधानांनी हसल्या. खणा नारळाची ओटी भरतांना काकूंनी साडीची घडी तिच्या हातात ठेवली. ती कमालीची संकोचत म्हणाली, "काकू, अहो ओटी घेते मी. पण.. साडी कशाला?"

तिला पुरतं बोलू न देता त्या म्हणाल्या, "माहेरवाशिण आहेस ना तू? ऐक माझं, घे ही साडी." तिच्या खांद्यावरून मायेचा पदर पसरतांना त्यांनी तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला.

तिला गहिवरून आलं, अनेक कोसांवर, खूप लांब असलेलं माहेर अंगणात येऊन उतरल्याचा तिला भास झाला. डोळ्यात गंगा यमुना अवतरल्या. तिचे डोळे पुसतांना काकूंनी आणखी एक बॉक्स तिच्या हातात दिला. "आता हे काय काकू आणखी? अहो किती करताय आमच्यासाठी, ? तिलाच दटावले त्यांनी, "हे बघ, आई सारखी मोठी बहीण मानतेस ना तू मला? मग मोठ्यांचं ऐकायचं असतं. ही माझ्याकडून छोटीशी सप्रेम भेट आहे तुला. नाही म्हणू नकोस." अहो पण काकू! आता पण बिण काही नाही हं ! हात पुढे कर. उडी मारून राज आईच्या मांडीवर बसला. "काकू आजी, असलीच आहे ही आई. कुणाकडून काही घेताना मागे मागे सरकते. मला द्या तो बॉक्स. एवढे भरुन चॉकलेट आहेत का हो त्यात" .

"नाही रे बाळा! हा खाऊ फक्त आईसाठी. तुझी आई खूप कष्ट करते ना? पोळ्या करून दमते ना! तिच्यासाठी हे कणिक मळायचे आणि पोळ्या करायचं मशिन आणलंय. आणि हो, शहाणी मुलं कुठे चॉकलेट खातात का? हवं तर तुला आणखी एक वाटीभर शिरा देते." आईच्या मोठ्या डोळ्यांकडे न बघता राज साहेब तरारले आणि पुटपुटले, "काकू आजी, खूप खूप आवडलाय मला शिरा. पण तुझ्यासाठी, आईसाठी राहू दे ना थोडा."काकूंना भडभडून आले. त्या म्हणाल्या, "पोरी भाग्यवान आहेस तू. किती निर्मळ निष्पाप मनाचा आहे तुझा राज. परिस्थितीला घाबरून गोड संसाराकडे पाठ फिरवून तुझा भेकड नवरा पळून गेला. पण सोन्यासारखं पोर आहे तुझ्या सोबतीला. मला तर ते पण नाही." पुढचे शब्द त्यांनी गिळून घेतले. नकोचं ती आठवण! ती चमकली. काकू काहीतरी लपवत आहेत आपल्यापासून. काहीतरी दुःख असेल त्यांच्या मनात.

डोळ्यातलं पाणी डोळ्यातच जिरवत त्या म्हणाल्या. "आता ही छोटीशी भेट घेणार आहेस का नाही? बघ जास्ती हट्टीपणा करू नकोस. नाहीतर मी जेवणारच नाही. आणि हो, तुझा माझा संबंध संपला. तिने घाबरून काकूंच्या तोंडावर हात ठेवला. "काकू नाही-नाही, असं नका हो करू! अहो तुमच्याशिवाय कोण आहे मला आणि माझ्या राजला ह्या जगात ? तुमच्या मायेच्या आधारावरच तर जगतोय आम्ही. राजच्या वडिलांनी फसवलं मला. तरुण वय, पाय घसरला माझा. आई-वडिलांनी घराबाहेर काढलं. माहेर कायमचं तुटलं. नवरा काही दिवस चांगला वागला. नंतर तोही बिथरला. जगणं असह्य केले त्यानी मला. त्याचे अत्याचार सहन करीत गेले, कारण पोटात बाळ होतं ना माझ्या ! अत्याचाराची परिसीमा गाठून काम झाल्यावर मला आणि माझ्या राजाला कचऱ्यासारखं



फेकून पळून गेला हो काकू माझा नवरा. पण माझ्या निराधार मनाला आधार दिलात तुम्ही, कधी कधी मन आक्रंदून उठतं. माझ्याच नशीब हे असं का?"

"शांत हो पोरी, मला कल्पना आहे तुझ्या मनाची. पण हे बघ बाळ, नशिबातले भोग हे भोगावेच लागतात. या भोगातून सीता सावित्री सारख्या पतिव्रता सुटल्या नाहीत, मग आपण तर काय सामान्य स्त्रिया. आता माझ्या मनातली खंत सांगते तुला, मी पण या अवस्थेतून गेले आहे, समाजाने तुडवलं आणि नवऱ्याने लाथाडलं मला."

डोळे विस्फारून तिने त्यांच्याकडे बघितलं. नेहमी हसतमुख असणाऱ्या काकूंच्या चेहऱ्याआड एवढं दुःख दाटले असेल याची तिला कल्पना नव्हती. त्यांना भूतकाळाबद्दल काही विचारण्याआधी, तिने चपापून आजूबाजूला बघितलं. आपला राजबाळ हे सगळं ऐकतं असेल असं तिला वाटलं.

काकू हसून म्हणाल्या, "घाबरू नकोस. तुझ्या आणि माझ्या दुर्देवी कहाणीने त्या चिमूरड्याच्या मनावर ओरखडे बसू नयेत म्हणून मी त्याला शिऱ्याची वाटी देऊन केव्हाच बाहेर पिटाळलय."

तिला खूप कौतुक वाटलं काकूंचं, किती मनकवड्या आणि धोरणी आहेत ह्या. दुसऱ्यांच्या भावना हळूवारपणे जाणून, सगळ्यांना योग्य दिशा दाखवतात. वाट चुकलेल्यांना सावरतात आणि अवखळ मुलींना आवरतात. प्राप्त परिस्थितीला सामोर जाऊन, आहे तो दिवस सत्कारणी लाऊन आनंदात उरलेले दिवस खंबीरपणे एकटीने व्यतीत करण्याच कसब आहे यांच्या अंगात. खरंच ग्रेट आहेत या काकू. मनातलं दुःख, जखम कधी कुणा पुढे उघडी नाही केली ह्यांनी.

न राहून तिने विचारलेचं, "काकू तुम्हाला ही काळज्या, व्यथा आहेतच की, त्या बाजूला सारून तुम्ही प्रत्येकीसाठी धावून जाता. मायेचा शब्द मिळतो आम्हाला तुमच्याकडून. तुम्हाला दुःख आहे आणि ते तुम्ही आमच्यापासून लपवता हे आज कळलं मला." तिला अडवत काकू म्हणाल्या, "माझी कर्मकहाणी राहू दे बेटा. भूतकाळ विसरायचा असतो. वर्तमान काळ जगायचा असतो, आणि भविष्य काळात आनंद शोधायचा असतो. अनुभवासारखा गुरु नाही बाळा जगात. माझ्यावर अनेक प्रसंग आले. तुझ्या वर आले ना त्याहीपेक्षा कठीण प्रसंगातून गेले आहे मी. पण निसरड्या वाटेवरून घसरताना कुणीही शब्दांचा, मदतीचा हातही पुढे केला नाही. आणि तेव्हापासून मी ठरवलं, वाट चुकलेल्या वासरांना आपण दिशा दाखवायची. त्यांना आधार द्यायचा. नातलगांकडून, समाजाकडून उपेक्षित झालेल्या स्त्रियांना मार्गी लावायचं. आपल्या कडू आठवणींचा भूतकाळ बाजूला सारून तुमच्यासारख्या तरुणींचा भविष्यकाळ उज्वल करायचा.

अगं तुम्ही मुली काय साधी भोळी भाबडी मुलं सुद्धा फसवली जातात. आणि मग निराशेच्या खोल गर्तेत गिरक्या घेऊन आत्महत्येच्या डोहात शिरतात. अशा तरुण-तरुणींना कुणीतरी सावरायला हवय गं." हो काकू, बऱ्याच जणांकडून कळलंय मला. तुम्ही कुणाची दीदी आहात, कुणाची ताई तर कुणाची माय आहात, कोणाची लेक सुद्धा होता तुम्ही. म्हणूनच म्हणते तुम्ही ग्रेट आहात. आमच्यासाठी वटवृक्षाची सावली आहात."

काकूंना एकदम काहीतरी आठवलं आणि त्या म्हणाल्या, "हे बघ बाळा, मी एके ठिकाणी सांगून ठेवलंय. तुला पुढच्या महिन्यापासून नोकरी मिळणार आहे." ती निशब्द झाली. कसे आभार मानू मी ह्यांचे.? आणि मग ठरल्याप्रमाणे तिला नोकरी लागलीही. काकूंची काळजी अजूनही मिटली नव्हती. रोज रोज राज त्यांना विचारायचा, "सांग ना काकू आजी, सगळ्यांचे बाबा संध्याकाळी घरी येतात. मी रोज पायरीवर बसून माझ्या बाबांची वाट बघतो. का गं घरी येत नाहीत माझे बाबा ? कुठे शोधू मी त्यांना ? कसे आहेत माझे बाबा? मी तर अजून त्यांना बघितलं पण नाही".

काकूंनी त्याला जवळ घेत समजावलं, "मी शोधून आणिन हो तुझ्या बाबांना. अशी एक संध्याकाळ येईल की तू बाबांच्या मिठीत असशील पोरा." नुसत्या कल्पनेनेच ते रडवेलं पोर खुदकन हसलं. काकूंचा लोकसंग्रह मोठा होता. सपना, शीला, यशोदा, मेनका, मदालसा ह्या वाट चुकलेल्या मुलींना त्यांनी मार्गाला लावलं होतं. आता राजच्या आईला, नंदिनीला त्यांना दिशा दाखवायची होती. तिचं आयुष्य योग्य वळणावर आणायचं होतं. आणि एकदम त्यांच्या डोळ्यासमोर समन्वय उभा राहिला. कर्तव्य तत्पर आणि प्रत्येक स्त्रीचा आदर करणारा आदर्श इन्स्पेक्टर समन्वय आणि समाज कार्य करणाऱ्या काकूंची चांगलीचं ओळख होती. त्याने मागे एकदा गुंड लोकांची टोळी पकडली होती. गुंडांच्या जाळ्यातून सुटका झालेल्या मुली नैराश्येने पछाडून सैरभैर झाल्या होत्या. काकूंनी त्यांना मार्गाला लावलं आणि तेव्हां पासूनचं त्या समन्वयच्या आदर्श होत्या. त्यांचा प्रत्येक शब्द त्याच्यासाठी प्रमाण होता. त्याच्या मार्फत काकूंनी राजच्या वडिलांचा खूप शोध घेतला. अखेर कळलं अनेक भानगडी करून, व्यसनाधीन होऊन त्या लफंग्याने आत्महत्या केली होती. **क्रमशः**

लेखिका- राधिका माजगावकर पंडित



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

# महिला सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल

आधुनिक केसरी

**सैन्य, नौदल आणि वायूसेना असे भारतीय लष्कराचे तीन भाग पडतात. लष्कराचे हे तीनही भाग अत्यंत शूर आणि बलवान सैनिक तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने बनले आहेत. यापैकी कोणत्याही दलात प्रवेश घेण्यासाठी अत्यंत कठोर निवड चाचणी आदींचा सामना करावा लागतो. भारतीय सैन्य दलाच्या तिन्ही शाखांत महिलांच्या प्रतिनिधित्वाबाबत एकेक निर्णय घेत आता देशाचे सैन्य दल घातक युद्धकौशल्य असणाऱ्या महिलांना आणखी एक आव्हान खुणावणार आहे.**

भारतीय नौदलाच्या मार्कोस आणि हवाई दलाच्या गरुडा या विशेष कमांडो पथकात महिला कमांडोंचा लवकरच समावेश केला जाणार आहे. लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या विशेष दलांमध्ये असणा-या कमांडोंना कठोर प्रशिक्षण दिले जाते. या कमांडोंवर विशेष आणि गुप्त ऑपरेशन्स करण्याची जबाबदारी असते. या कामामध्ये स्पेशल फोर्स कमांडो निपूण असतात. या कमांडोसाठी आतापर्यंत फक्त पुरुषांना परवानगी होती. पण आता भारतीय नौदल महिलांनाही कमांडो होण्याची संधी देणार आहे. मात्र त्यासाठी त्यांना अतिशय कठोर समजल्या जाणाऱ्या चाचण्यांतून यशस्वीपणे जावे लागणार आहे. भारतीय नौदलातील हा अत्यंत महत्त्वाचा आणि दुरगामी निर्णय आहे. हा ऐतिहासिक निर्णय असून जगातील सर्वात घातक समजल्या जाणाऱ्या या घातक कमांडो फोर्सचा लौकिक या निर्णयामुळे वाढणार आहे. आता प्रशिक्षणानंतर महिलांनी निकष पूर्ण केल्यास त्यांना नौदलात मरीन कमांडो म्हणजे मार्कोस होण्याची संधी मिळेल. आजवरच्या इतिहासात भारतीय नौदलात अशी थेट नियुक्ती केव्हाच करण्यात आली नाही. या महिला कमांडोंना स्वयंसेवक म्हणून काम करावे लागेल.
पुढील वर्षीच्या अग्निवीर भरतीमध्ये भारतीय नौदलात सामील होणा-या महिला अधिकारी आणि नाविक यांना मार्कोस प्रशिक्षणासाठी परवानगी देण्यात येईल. मरीन कमांडो भारतीय नौदलातील स्पेशल फोर्स कमांडो आहेत. नौदलातील मार्कोसना अनेक विशेष मोहिमांसाठी प्रशिक्षित केले जाते. हे कमांडो समुद्र, हवेत आणि जमिनीवर विशेष मोहिमा राबवू शकतात. हे कमांडो शत्रूच्या युद्धनौका, लष्करी तळावर हल्ले करतात आणि विशेष डायव्हिंग ऑपरेशन्स सारख्या गुप्त मोहिमा पार पाडतात. मार्कोस हे सागरी क्षेत्रातील दहशतवाद्यांशी लढून त्यांना चोख प्रत्युत्तर देतात. सध्या काही मार्कोस दहशतवादविरोधी भूमिकेत काश्मीरमधील वुलर लेक परिसरात तैनात करण्यात आले आहेत. या कमांडोंनी पाकिस्तानी अतिरेक्यांचा मुकाबला करताना हाती घेतलेले ऑपरेशन ब्लॅक टोर्नेडो जगातील युद्धकौशल्यातील मानाचे पान समजले जाते. विविध देशांच्या कमांडो प्रशिक्षणात त्याचा सातत्याने गौरवाने उल्लेख केला जातो. अमेरिकेच्या मरिन कमांडो आणि ब्रिटनच्या रॉयल नेव्ही कमांडो युनिटखालोखाल भारताच्या मार्कोसचे नाव घेतले



जाते. या मार्कोस दलात आता महिला कमांडो सामील होणार आहेत. मात्र या दलात समाविष्ट होण्यासाठी अत्यंत कठोर अशा चाचण्यांतून जावे लागणार आहे. सर्वच कमांडोंना या चाचण्या अत्यावश्यक असतात. त्यातून उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण अवघे २० टक्के असते. मार्कोसने आतापर्यंत श्रीलंकेतील लिट्टेविरोधी मोहीम, जम्मू काश्मीरमधील अतिरेकीविरोधी मोहिमा, हिंद महासागरातील समुद्री चाचेविरोधी मोहिमा, लेहमधील तैनाती आदी मोहिमा हाताळल्या आहेत. त्यातील ताज हॉटेल कारवाई मोहीम सर्वाधिक प्रकाशझोतात आली. नौदलाच्या पाठोपाठ हवाई दलाच्या गरुड या कमांडो दलातही महिला कमांडोंच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याबाबतच्या निर्णयावर लवकरच अंतिम शिक्कामोर्तब होणार आहे. महिलांना आता जमीन, पाणी, हवेतही देशसेवा करण्याची मोठी संधी मिळणार आहे. नौसेना यासाठी मोठी पावलं उचलत आहे. अद्याप याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही, मात्र लवकरचं ही ऐतिहासिक घोषणा होण्याची शक्यता आहे. नौदलाने विशेष ऑपरेशन्सपासून ते फ्लाइंग आणि युद्धनौकापर्यंत सर्व शाखांमध्ये महिलांसाठी दरवाजे खुले केले आहेत. महिला आणि पुरुषांसाठी समान संधी असलेल्या तटस्थ दलात नौदलाचे रूपांतर पाहायला मिळत आहे. त्यामुळे महिलांसाठी ही मोठी सुवर्णसंधी असणार आहे. तिन्ही सैन्यदलांमध्ये महिला आधीच वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहेत. भारतीय नौदल ओडिशातील आय.एन.एस. चिल्का प्रशिक्षण केंद्रात महिलांसह अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीला प्रशिक्षण देत आहे. नौदलाच्या अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीत ३,००० प्रशिक्षणार्थींचा समावेश असून यामध्ये ३४१ महिला देखील सहभागी आहेत. अशा परिस्थितीत त्यांचे कमांडो होणे हे देशातील महिला सक्षमीकरणासाठी एक नवे पाऊल ठरेल. या निर्णयामुळे भारतीय महिलांना नोकरी आणि व्यक्तीमत्व विकासाची तसेच जीवनमान उंचावण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. भारतीय लष्करी इतिहासातील हा खरोखरच गौरवशाली क्षण आहे.

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

आधुनिक केसरी

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील.

श्याम ठाणेदार
संपर्क क्र. ९९२२५४६२९५



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

# चला चहा घेताय ना ? चला तर घेऊ मग चहा

आधुनिक केसरी

**चहा हे तर आपले अतिशय प्रिय,आणि लोकप्रिय पेय आहे. इतर अनेक पेय आहेत, पण त्यामानाने हे स्वस्त आणि मस्त पेय आहे. चहात कधी आले तर कधी विलायची टाकून चहा बनवला जातो. तसेच गवती चहा मिळतो तो टाकूनही चहाची लज्जत वाढते. चहा कोणत्या सिझन मध्ये आणि कुठे आणि कोणा सोबत घेतो हेसुद्धा महत्त्वाचे आहे. चहा मोठ्या हॉटेलमध्ये मिळतो आणि रस्त्यावरच्या चहाच्या टपरीवरही मिळतो. पण रस्त्याच्या कडेला उभे राहून आणि त्यातही ग्लास मध्ये वाफाळलेला चहा चहाचे टपरीवर चहा घेण्याची मजा काही औरच असते.**

तसेच आपण चहा कशाबरोबर घेत आहे हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे असते.
अर्थात प्रत्येकाचे आवडीनुसार त्या त्या वेळी त्या त्या सीझनमध्ये ते घेण्याची मजा असते. कधी गरम-गरम बटाटावडा मिरची,कधी कधी भजे या सोबत घेतलेला चहा, तर दिवाळीच्या दिवसात चकली बरोबर घेतलेला चहा. आणि रोज आपली सकाळ होते ती चहा पिऊनच. तेव्हा रोज कधी खारी बिस्कीट, गोड बिस्किट, खारी, पाव, या सोबत घेतलेला चहा.
निरनिराळ्या गावी जातो तिथेही आपली चहाची विशिष्ट ठिकाण असतात, त्याच ठिकाणी चहा घेत असतो.. पुण्यात बालगंधर्व चौकात,कोल्हापूरच्या महाद्वार रोडवर ताज्या दुधाचा घोटीव चहा, नासिकला एम. जी रोडवर,मिरजेच्या स्टेशन रोडवर,जळगांव, भुसावळ, जामनेर, दादर,मुंबई, डोंबिवली, असे निरनिराळ्या शहरात आपण जातो त्या ठिकाणी चहा घेण्याची एक वेगळीच मजा असते. क्वचित प्रसंगी आपण आवडीने त्या ठिकाणी दोन दोन वेळा चहा घेतो. तो चहावालाही आपली आवड लक्षात घेता आनंदाने आपल्याला जसा हवा तसा चहा करून देतो आणि परत या आमंत्रण देतो. अशी अनेक ठिकाणा आपण त्यासाठी आपल्या मनात ठेवलेले असतात.
चहाला अनेक नावाने संबोधले जाते कधी त्याला "कडक मीठा" म्हणतात, तर कधी "पंजाबी तर कधी गुलाबी' तर कुठे त्याला "अमृततुल्य" असेही म्हणतात. चार मित्र एकत्र जमले की त्यांना थोड्यावेळात चहा पिण्याची लहर आली नाही तर नवलच. चला...चार कट...पाच कट...अशी ऑर्डर....



जगभरात दरवर्षी 15 डिसेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय चहा दिवस" म्हणून साजरा केला जातो. अनेक देशात चहाचे उत्पादन आणि वितरण विक्री हे अनेक कुटुंबाचे परिवारासाठी जगण्याचं मुख्य साधन तर आहेच, पण देशासाठी उत्पन्नाचा मोठा स्त्रोत आहे. आणि या चहाच्या उद्योगाच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. चहा हे नगदी पीक आहे. आपल्या दैनंदिन जीवनात चहाचे महत्त्व आहेच. तसेच चहाचा व्यापार आणि चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या लाखो कामगारांकडे लक्षवेधी आहे हा चहा दिवस साजरा केला जातो. अर्थातच चहाच्या व्यापाराला प्रोत्साहन देऊन या उत्पादनाकडे सगळ्यांचं लक्ष वेधणे हा हेतू असतोच. भारत, केनिया, व्हियेतनाम, युगांडा, मलेशिया, इंडोनेशिया, चीन, श्रीलंका, या देशात चहाचे उत्पादन घेतले जाते. आंतरराष्ट्रीय संघटनेच्या बैठकीत 15 डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय चहा दिवस म्हणून साजरा करावा हा निर्णय झाला, आणि त्यानंतर 2005 सालापासून 15 डिसेंबरला आंतरराष्ट्रीय चहा दिवस साजरा होऊ लागला. डिसेंबर महिना हा थंडीचा महिना आहे. आणि त्यादृष्टीने चहा हे महत्त्वाचे पेय आहे. त्याला पुढे आल्यानंतर कोणी नाही म्हणत नाही. अर्धा अर्धा कप जरी म्हटला तरी दिवसभरात 5/7 वेळी होतोच, आणि या चहा चा मोह थंडीच्या दिवसात आवरला जात नाही. त्यादृष्टीने डिसेंबर महिना हा महत्वाचा आहे.



भारताने 2015 साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या फूड अँन्ड अग्रिकल्चर ऑर्गनायझेशनला आंतरराष्ट्रीय चहा दिवसाची व्याप्ती वाढवायचा प्रस्ताव दिला. त्यानुसार संयुक्त राष्ट्र संघटनेने यावर अनेक देशांचा विचार घेऊन 21 मे जागतिक चहा दिवस साजरा करावा असा निर्णय घेतला.
चहा जगातील सर्वाधिक सेवन केल्या जाण्याऱ्या पेया पैकी एक आहे. त्यामुळेच प्रत्येकाची चहा बनवण्याची पध्दत वेगळी असते. कुणाला आलं घालून चहा प्यायला आवडतं तर कुणाला ब्लॅक टी प्यायला आवडतो. जगात चहाची शेती सर्वप्रथम चीनमध्ये करण्यात आली होती.
म्यानमार आणि आसामच्या पर्वतीय भागात 1824 सालच्या दरम्यान चहाचे पानं सापडली. त्यानंतर इंग्रजांनी 1836 सालापासून चहाचे उत्पादन सुरु केलं. सुरुवातीला यासाठी चीनमधून चहाचे बी मागवले जात होते
त्यानंतर आसामच्या भागातील चहाच्या बियांचा वापर सुरु झाला. भारतातील चहाचे उत्पादन हे ब्रिटनमधील चहाची मागणी पूर्ण करण्यासाठी केलं जायचं. आज चहा हे भारतात सर्वात स्वस्त आणि लोकप्रिय पेय आहे. आसामचा चहा सर्व जगभर आसाम टी म्हणून प्रसिध्द आहे.
चीन हा जगातील सर्वात मोठा चहाचा निर्यातक देश आहे भारतातही चहाचं मोठ्या प्रमाणात उत्पादन होतं पण स्थानिक स्तरावर त्याचं सेवनही मोठ्या प्रमाणात केलं जातं. टी बोर्ड ऑफ इंडियाच्या मते, भारतातील चहाच्या एकूण उत्पादनापैकी 80 टक्के उत्पादन हे भारतातच सेवन केलं जातं.चहामध्ये प्रोटिन, पॉलीसॅकेराइड, पॉलिफेनॉल, मिनरल्स आणि अमिनो, कार्बनिक ॲसिड, लिग्निन आणि मिथाइलक्सैन्थिन (कॅफिन, थिओफिलाइन आणि थियोब्रोमाइन) हे घटक असतात. हे शरीराला फायदेशीर असतात. चहामध्ये फायटोकेमिकल्स असतात जे आपल्या शरीरात शक्तिशाली ऑटी एक्सीडेंट म्हणून कार्य करतात.
शहरी भागात अनेक ठिकाणे "प्रेमाचा चहा" " या चहा घ्यायला" चहा घेताय ना"... "अमृततुल्य"... "चहा डॉट कॉम"-- अशा अनेक नावांनी चहाची दुकान सजलेली असतात.. त्याबरोबर कुठे गरम गरम भजी, वडा, असे असते. ऐन पावसाळ्यात चहाच्या टपरी वर जाऊन चहा.. भजी खाण्यात काय वेगळीच मजा असते तर कधी शहरात जुनी इराणी हॉटेल सारखी हॉटेल आहे तेथे बसून चहाचा घोट घेत घेत बाहेरच्या पावसाची मजा पाहणे ही वेगळी मजा आहे. चहा हे पेय आहे की एकमेकात जवळीक निर्माण करते. आपण सहज कोणालाही घरी बोलावतो, त्याला म्हणतो या चहा पाण्याला अगदी कुठलाही कार्यक्रम असो चहा घेतल्याशिवाय सुरवत होत नाही. लग्न ठरवताना सुद्धा चहा पोहे असाच कार्यक्रम असतो आणि आपण गाणे ऐकतो,शायद मेरे शादी का खयाल दिल मे आया है... आणि मम्मीने तुम्हे चाय पे बुलाया है... येथे चहा आलाच.श्रीमंत असो वा गरिब... त्यात मात्र भेदभाव नाही असे हे एकमेव पेय..... चला तर मग चहा घेऊन साजरा करुया हा दिवस.
चहा घेताय ना.... घ्यायलाच पाहिजे...!!!

# विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ घेण्याची 31 डिसेंबरपर्यंत संधी

## कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना महावितरणचा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीजबिलांच्या थकबाकीपोटी कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांकडील वीजपुरवठ्याच्या पुनरुज्जीवनासाठी महावितरणने सुरू केलेल्या विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ घेण्याची संधी 31 डिसेंबर 2022 पर्यंत उपलब्ध आहे. योजनेत घरगुती ग्राहकांसोबतच व्यवसाय आणि उद्योगांना पुनरुज्जीवनाची संधी मिळून राज्यातील अर्थकारणाला गती मिळणार आहे.

या योजनेनुसार थकबाकीची मूळ रक्कम हप्तेवारीने अथवा एकरकमी भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पूर्णतः माफ करण्यात येत आहे. 31 डिसेंबर 2021 रोजी किंवा त्यापूर्वी थकबाकीपोटी कायमचा वीजपुरवठा खंडित केलेले सर्व बिगर कृषी उच्चदाब आणि लघुदाब ग्राहक या योजनेस पात्र आहेत. योजनेचा कालावधी 6 महिन्यांसाठी (1 मार्च 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यंत) होता. मात्र, अनेक ग्राहकांनी या योजनेला मुदतवाढ देण्याची विनंती करीत वीजबिल थकबाकी भरण्याची तयारी दर्शविल्याने आता या योजनेस डिसेंबर-2022 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय महावितरण प्रशासनाने घेतला. योजनेचा लाभ घेण्यासाठी अखेरचे तीन आठवडे राहिले आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक आणि पात्र ग्राहकांनी 31 डिसेंबर 2022 पर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. थकबाकी एकरकमी भरण्यास इच्छुक असलेल्या ग्राहकांनी उच्चदाबाच्या वीज जोडणीसाठी मूळ थकबाकीच्या 95 टक्के किंवा लघुदाबाच्या वीज जोडणीसाठी मूळ थकबाकीच्या 90 टक्के आणि सोबतच अर्ज मंजुरीच्या 30 दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर शुल्क भरावे लागेल. हप्तेवारीने पैसे भरण्यास इच्छुक असलेल्या ग्राहकांना पहिला हप्ता हा मूळ थकबाकीच्या 30 टक्के आणि सोबतच अर्ज मंजुरीच्या 7 दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर शुल्क भरावे लागेल. उर्वरित रक्कम ठराविक हप्त्यात महिन्याच्या शेवटी किंवा त्यापूर्वी भरायची आहे. ज्या ग्राहकांचे अर्ज 30 सप्टेंबर 2022 रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज मंजूर केले



आहेत त्यांनी 31 ऑक्टोबर 2022 पर्यंत थकबाकीच्या 30 टक्क्यांचा पहिला हप्ता किंवा संपूर्ण थकबाकी एकरकमी भरावयाची आहे. हप्तेवारीचा लाभ घेणारा ग्राहक हप्ता भरण्यास अपयशी ठरल्यास तो ग्राहक या योजनेतून अपात्र ठरेल आणि त्यास कोणतेही लाभ दिले जाणार नाहीत. थकबाकीपोटी कायमचा वीजपुरवठा खंडित केलेल्या औरंगाबाद परिमंडलातील बिगर कृषी उच्चदाब आणि लघुदाब ग्राहकांनी अधिकाधिक संख्येने या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# फुलंब्री येथे गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे नगर पंचायत कार्यालयात सोमवारी सकाळी 11 वाजेच्या सुमारास लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली नगराध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले यावेळी भाजप शहराध्यक्ष योगेश मिसाळ देवराव राऊत पंडित नांगरे राजेंद्र नांगरे गजानन नांगरे वाल्मिक जाधव राम बनसोड सुमित प्रधान सभापती गणेश राऊत गणेश शेरकर नागेश भारद्वार बाळासाहेब नांगरे रवी शेवाळे अजय नांगरे आकाश गोरावाने सचिन घाटे भगवान शेवाळे उपस्तित होते.

# आरोपीची माहिती देणाऱ्यास ५० हजारांचे बक्षीस देणार; फर्दापूर पोलिसांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पळसखेडा येथील १६ वर्षीय बालिकेला पळवून नेणाऱ्या आरोपीचा किंवा १६ वर्षीय बालीकेचा शोध घेणाऱ्या किंवा पत्ता सांगणाऱ्या व्यक्तीला ५० हजार रुपयाचे बक्षीस फर्दापूर पोलिस स्टेशनच्या वतीने सपोनि देवीदास वाघमोडे यांनी जाहीर करण्यात आले असून आरोपीचा किंवा बालीकेचा पत्ता सांगणाऱ्या व्यक्तीचे नाव व पत्ता सर्व गुप्त ठेवला जाणार असल्याची माहिती फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिली आहे १८ ऑगस्ट २०२१ रोजी आरोपी राहुल शिवसिंग महेर याने पळासखेडा येथील सोळा वर्षीय माधुरी नामक बालिकेला पळवून नेले होते या प्रकरणी १९ ऑगस्ट २०२१ रोजी माधुरीच्या वडीलाच्या फिर्यादी प्रकाश दलपत शिंदे वरून फर्दापूर पोलीस ठाण्यात आरोपी राहुल शिवसिंग महेर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात



आला होता त्यानंतर पोलिसांनी या गुन्हा यातील आरोपी राहुल महेर व सोळा वर्षीय माधुरीचा सर्वत्र शोध घेतला मात्र आत्तापर्यंत ते मिळून आलेले नाही या पार्श्वभूमीवर आरोपी राहुल महेर किंवा सोळावर्षीय माधुरीचा पत्ता सांगणाऱ्या व्यक्तीला ५० हजार रुपयाचे बक्षीस फर्दापूर पोलिसांनी जाहीर केले असून याबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव वो पता गुप्त ठेवला जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे दरम्यान आरोपी राहुल महेर किंवा सोळावर्षीय माधुरी बाबत माहिती असणाऱ्या व्यक्तीने सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे किंवा पोलीस नाईक निलेश लोखंडे यांना तात्काळ संपर्क साधावा असे आव्हान फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी केले आहे.

# दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथे येथील सह्याद्री पार्क मध्ये दि.११/१२/२२ रविवार रोजी श्री दत्तात्रय प्रभू अवतार व भागवत वाचन वपंचवतार निमित्त मंदिराचा भूमिपूजन समारंभ, ध्वजारोहण कार्यक्रम द्वीप प्रज्वलन करून संपन्न झाला. आ. रमेश पा. बोरनारे यांनी भूमिपूजन केले. एकनाथ जाधव, कल्याण दांगोडे, साबेरखान,कैलास पवार, ज्ञानेश्वर जगताप, धिरेंद्र मुनी, भागवत वाचिका श्रद्धा कपाटे, दयामुनी दादा, डॉ. राजीव डोंगरे, कारभारी कराळे, शैलेश चव्हाण, गणेश खैरे, दिनेश राजपूत यांनी ध्वजारोहण केले. तर द्वीप प्रज्वलन मोहन आप्पा आहेर, सुभाष आव्हाळे, धोंडीराम राजपूत यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात धोंडीरामसिंह राजपूत यांनी सह्याद्री पार्कमध्ये या होणाऱ्या श्रीदत्त मंदिरची माहिती देऊन आमदार निधीची मागणी केली, आ. बोरणारे यांनी येत्या मार्चपर्यंत मंदिर सभामंडप काम करून देण्याचे आश्वासन दिले. एकनाथ जाधव




यांनी ही सहकार्य करण्याचा संकल्प केला. याप्रसंगी माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर इंगळे या प्रसंगी बाबासाहेब जगताप, डॉ. गणेश अग्रवाल,श्रद्धा कपाटे, बाबा साहेब जगताप, प्रभाकर गुंजाळ, शरद मोटे,करणं जेजुरकर श्री दिघोळे सुभाष कानडे यांची उपस्थिती होती. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.

# चंद्रकांत पाटील यांचा पहुर येथे निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर, सोमवारी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पैठण येथे एका जाहीर कार्यक्रमात क्रांतीसुर्य महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांबद्दल अपशब्द काढले. या प्रकरणी क्षत्रिय माळी समाज संघटनेच्या वतीने पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संजय बनसोड यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले. क्षत्रिय माळी समाज संघटनेचे उपाध्यक्ष ज्ञानदेव करवंदे, तुषार बनकर यांनी तीव्र शब्दात चंद्रकांत पाटील



यांच्या वक्तव्याचा निषेध केला. यावेळी महात्मा गांधी तंटामुक्ती समिती अध्यक्ष योगेश बनकर, दीपक जाधव, आशिष माळी, रोशन चौधरी, रोशन भडांगे, ईश्वर बनकर, पुंडलिक भडांगे, शंकर सोनवणे, बाबुराव क्षीरसागर, श्रावण घोंगडे, महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेचे जिल्हा सचिव शंकर भामेरे, चेतन रोकडे, सुनिल घोलप यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयगाव परिसरात रब्बी हंगामातील कामांना वेग

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** रब्बी हंगामात पिकामध्ये निंदण, काडी कचरा वेचने आणि पिकांना पाणी देण्याच्या कामाला वेग आलेला दिसतो. शेतकरी मजुर शेतीचे काम उत्साहाने करत असुन शेतकऱ्यांमध्ये शेती पिकवण्यासाठीची धडपडही दिसत आहे. सध्या मोठ्या संख्येने रब्बी हंगामातील अतिशय महत्त्वाचे हरभरा पिक समजले जाते आणि सध्या या पिकामध्ये निंदन काडी कचरा वेचणे इत्यादी मोठ्या संख्येने काम करत दिसत आहे. महिला आणि पुरुष दुसरे पिकाला पाणी देण्यासाठी धावपळ स्पिंकलरच्या द्वारे करीत आहे. पिकाला पाणी स्पिंकलरने देण्याचीही गरज भासते.



पिकाला वाचवण्याकरता कसरत शेतकऱ्यांमध्ये पाहायला मिळत आहे.अतिशय पोषक वातावरण मध्ये प्रचंड प्रमाणात पिकामध्ये वाढ पाहायला मिळत आहे व शेतकरी वर्गात आनंदमय वातावरण पाहायला मिळत आहे. सध्याच्या परिस्थिती चांगले पीक फुलफुलित दिसत आहे. परंतु यापुढेही वातावरण नैसर्गिक बदलांमध्ये परिणाम पाहायला दिसतील याची चिंता शेतकऱ्यांना वाटत आहे.

# 'जीवनातील वनात' या काव्यसंग्रहाची उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठा तेज न्यूज चॅनल चे संपादक तसेच पत्रकार संघाचे सरचिटणीस, युवा साहित्यिक नारायण जाधव पाटील यांच्या जीवनातील वनात या काव्यसंग्रहाची समर्पण मराठी साहित्य कला मंच नवी मुंबईच्या वतीने उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून प्रथम क्रमांक ची निवड करण्यात आली असून 26 जानेवारी 2023 रोजी आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलन कार्यक्रमात मान्यवर मंडळींच्या शुभहस्ते त्यांचा उत्कृष्ट युवा साहित्यिक म्हणून




सत्कार करून सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती समर्पण साहित्य कला मंचच्या संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे. जाधव यांच्या जीवनातील वनात या काव्यसंग्रहात विविध विषयांवर काव्यांचा समावेश असून या अगोदर ही या काव्यसंग्रहास उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून निवड झालेली आहे. त्यांच्या काव्यसंग्रहास उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे विविध मान्यवर तसेच मित्रपरिवाराच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्या देण्यात येत आहे.

# उमरी ग्रामीण रुग्णालय शहराबाहेर जाऊ देणार नाही

## सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांचा निर्धार; आज मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** शहरातील सर्व्हे नं. 154 मध्ये गेली 60 ते 65 वर्षापासून असलेला सरकारी दवाखाना शहराबाहेर न जाऊ देण्याचा निर्धार उमरी शहर व तालुक्यातील सर्वपक्षिय पदाधिकाऱ्यांनी केला आहे.
उमरी येथील ग्रामीण रुग्णालयाचे जागेचा मालकी हक्क वाद गेली अनेक वर्षांपासून न्याय प्रविष्ट असल्यामुळे वसंतराव चव्हाण आमदार असतांना रू. 60 लक्षचा जिल्हा नियोजन व विकास संस्थेकडून आलेला निधी परत गेला असून सध्या एन. आर. एच. एम. मधून रुग्णालय ईमारत बांधकामासाठी रू. 3.00 कोटी मंजूर असुन ह्या न्यायालयीन प्रक्रियेमुळे तो निधी परत जाऊ नये म्हणुन शासनस्तरावर हे रुग्नालय गोरठा शिवारातील सर्व्हे नं. 2/1 मधिल 10 एक्कर गायरानात करण्याचा घाट घातल्या गेला असून त्या अनुषंगाने तहसीलदार माधव बोथीकर यांनी उपअधीक्षक, तालूका भूमी अभिलेख कार्यालय उमरीला दिनांक 1 डिसेंबर रोजी पत्र देऊन दिनांक 2 डिसेंबर रोजी संबधित झमिनीची मोजणी करुन घैतली आहे.
ही माहिती हळू-हळू शहर व तालुक्यात पसरली त्यामुळे तालूक्यात गरमा गरम चर्चा होऊन ह्या विरूध्द जनतेत उद्रेक निर्माण होऊन आंदोलन छेडण्याचा इशारा कांही पक्षांचे पदाधिकारी यांनी एकत्र येऊन प्रशासनास दिलेला आहे.
दिनांक 14 डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय उमरी येथून सकाळी 10.00 वाजता एक सर्वपक्षिय मोर्चा निघून तहसील कार्यालयावर धडकणार आहे. तिथे मोर्चाचेवतिने एक निवेदन तहसीलदार यांना देण्यात येणार आहे.
तसेच हा विषय उमरी शहराचे विकासाचा असल्यामुळे स्थानिक व्यापारी वर्गांनी आपापली दुकाने एक दिवस बंद ठेऊन आपला निषेध नोंदवावा अशी विनंती व्यापारी वर्गास करण्यात आलेली आहे.
सदरील निवेदनावर उद्योजक मारोतराव कवळेगुरुजी, माजी नगराध्यक्ष व



बाळासाहेबांची शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुभाष पेरेवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष पांडूरंग देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, शिवसेना उध्वव ठाकरे गटाचे शहराध्यक्ष साईनाथ मुटकुटवार, भाजपाचे शहराध्यक्ष गजानन श्रीरामवार, काँग्रेस पक्षाचे नायगाव विधानसभा मतदारसंघाचे युवकांचे अध्यक्ष बापुसाहेब येताळे कौडगावकर, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किशोर पबितवार, शेख शकिल, गजानन आडगुडवाड, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, सटवा पवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ. आंबेडकरांचा पुतळा हटविल्याने तणाव

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जयभवानी रोड परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा हटवल्याने सध्या तणाव निर्माण झालेला आहे. नाशिकमध्ये महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी देण्यात आली. पुन्हा पुतळा बसवण्याची आंदोलकांनी मागणी केलेली असून अन्यथा आमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.  नाशिकच्या जयभवानी रोडवरील मनपाच्या नियोजित उद्यानात 6 डिसेंबरला आंबेडकरांचा पुतळा बसविण्यात आला होता, परवानगी न घेता पुतळा बसविल्यानं मध्यरात्री मनपाने पुतळा हटविला. त्यामुळे काही प्रमाणात तणाव निर्माण झाला असून नागरीक रस्त्यावर येण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नाशिकरोड परिसरातील जयभवानी रोडवरील तुळजाभवानी मंदिराशेजारी मनपाच्या जागेत उद्यान साकारण्यात येत आहे. त्यामध्ये नव्याने बसविलेल्या गजिबो अनधिकृतपणे चबुतरा बांधून पूर्वपरवानगी न घेता त्या चबुतऱ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवण्यात आल्याने खळबळ उडाली होती. त्यानंतर उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान पोलीस आणि स्थानिकांमध्ये बाचाबाची झाल्याचे पाहायला मिळाले होते. त्यानंतर या ठिकाणाहून पुतळा हटविण्यात आला होता. या पार्शवभूमीवर आज स्थानिकांनी एकत्र येत पुन्हा पुतळा बसवावा ह्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. पुतळा हटविला त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो ठेऊन अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर मनपा आणि पोलीस प्रशासना विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. पुन्हा पुतळा बसवावा नाही तर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा आंदोलकांनी यावेळी दिला आहे.

# माळीवाडा येथे युवकाची फाशी घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**माळीवाडा :** येथील शंकर वसंत साठे (३२) राहत्या पत्र्याच्या घरच्या लाकडाच्या बलीला गळ्यातील मफलरने फाशी घेऊन आत्महत्या केली ही घटना आज दि.१२ सकाळी सात वाजता उघडकीस आली शंकर हा आज लवकर उठला नाही म्हणून चे त्यांचे वडील वसंत यांनी दरवाजा कडी वाजली असता मागु पुढुन मधुन आतुन कडी लावून घेतली होती त्यांने आवाज दिला नाही म्हणून वडील ने खिडकीतून डोकावून पाहिले असता तो लटकलेल्या अवस्थेत दिसून आला याची माहिती पोलीस पाटील प्रमोद साठे यांना देण्यात आली पोलीस पाटील यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक दिलीप बचांटे यांना दिली घटनेची माहिती मिळताच बचांटे व राठोड यांनी घटनास्थळी येऊन पंच समक्ष दरवाजा तोडून शंकर लटकलेले अवस्थेत दिसल्या नंतर त्याला पोलिसांच्या मोबाईल टू गाडीमध्ये टाकून घाटी दाखल करून डॉक्टरांनी तपासले असता मृत घोषित केले या घटनेची नोंद बोलतात पोलीस स्टेशनमध्ये घेण्यात आली आहे त्याच्या पश्चात आई वडील पत्नी एक ८ वर्षीची मुलगी एक ५ वर्षांचा मुलगा आहे.  विशेष म्हणजे त्याच्या लहान भावाने सहा महिन्यापूर्वी याच घरात फाशी घेऊन आत्महत्या केली होती.

# बनावट चावीद्वारे वाहनांची चोरी करणारा जाळ्यात




आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बनावट चावी बनवून दोन पीकप वाहन चोरीला गेल्याची माहिती  एलसीबी चे हेमंत पाटील यांना कळाली माहिती मिळताच ताबडतोब वाहनाची चौकशी करत असताना हॉटेल फाय फाय  जवळून वडजाई कडे जात असतांना एलसीबी पथकाने त्यांच्या मुसक्या आवळल्या. पोलीस निरीक्षक यांना गुप्त माहिती मिळाली कि विना नंबरचे पिकप वाहन येवुन उमे असुन सदर वाहने चोरीची आहेत अशी माहिती मिळाली हेमंत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेच्या पथक सदर इसमांचा शोध घेत असताना चाळीसगाव रोड वरील हॉटेल फाय - फाय च्या पुढे वडजाई गावाकडे जाणाऱ्या रोड वर दोन इसम दोन पिक अप वाहने अंधारात उभे असल्याचे दिसले. बातमीप्रमाणे संशय आल्याने 21.15 वाजता त्यांचावर छापा टाकला असता दोन्ही इसम पोलीस आल्याचे पाहून अंधारात पळून जात असताना त्यातील नाव विचारता त्याने त्याचे नाव गाव इम्रान शहा गफ्फार शहा, वय 28 वर्ष , रा. विजयनगर, कुसुंबा रोड, मालेगाव असे असल्याचे सांगीतले. पळुन गेलेल्या इसमाचे नाव गाव विचरता अफसर शहा सलीम शहा, रा. स्विमींग पुलजवळ , दरेगाव रोड मालेगाव असे असल्याचे सांगीतले. अफसर शहा सलीम शहा याचा शोध घेता तो मिळुन आला नाही. इमान शहा कार्यालयात आणुन विचारपुस करता पिक मालेगाव येथुन वा नंबरचे पिक अप वाहन गफ्फार शेठ यास त्याच्या ताब्यात मिळून आलेल्या दोन्ही पिक अप वाहनासह स्थागुशा अप क्रमांक MH 48 T 1637 है सात - आठ दिवसापुर्वी ठुडको कॉलनी, सुमारे दोन महिण्यापुर्वी यासीन मशीद जवळ, मालेगाव येथुन अफसर शहा सलीम शहा व त्यांच्या अन्य दोन साथीदारांसह बनावट चावीचा वापर करून चोरी केले असल्याचे सांगीतले आहे. इम्रान शहा गफ्फार शहा याच्या ताब्यातुन खालील वर्णनाचे पिक अप वाहने जप्त करण्यात आले आहेत. सदर वाहनाबाबत खात्री करता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस स्टेशनचे नाव मालेगाव शहर पोलीस स्टेशन, मालेगाव पवार वाडी पोलीस स्टेशन, मालेगाव येथे इतर गुन्हे  उघडकीस आले असुन आरोपी इम्रान शहा गफ्फार शहा, वय 28 वर्ष, रा. विजयनगर, कुसुंबा रोड, मालेगाव यास पुढील तपास कामी मालेगाव शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक संजय बारकुंड साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक किशोर काळे साहेब यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थागुअशा धुळेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील , पोउनी  योगेश राऊत, असई संजय पाटील पोह रफीक पठाण, प्रभाकर बैसाणे, श्रीकांत पाटीलपोना, योगेश चव्हाण, राहुल सानप, पोशि / योगेश जगताप, किशोर पाटील, सुनील पाटील, श्रीशैल जाधव, चापोशि / कैलास महाजन , राजीव गिते अशांनी केली आहे.

# पेपरलेससाठी मदत करा, वीजबिलात सवलत मिळवा

## 'गो ग्रीन' योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १ एप्रिलपासून ई-ऑफिस प्रणाली सुरू करणार असल्याची घोषणा नुकतीच केली असून त्यामध्ये पेपरलेस व्यवहार करण्यावर भर असेल. त्या दिशेने महावितरणने बिलांच्या बाबतीत यापूर्वीच काम सुरू केले असून 'गो ग्रीन' योजनेचा लाभ घेऊन वीज ग्राहकांनी पर्यावरण वाचविण्यास मदत करावी आणि प्रत्येक बिलात दहा रुपये सवलत मिळवावी, असे आवाहन अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले.  ते म्हणाले की, महावितरणच्या 'गो ग्रीन' योजनेत ग्राहकांनी छापील कागदी बिलाच्या ऐवजी ई-मेलने येणाऱ्या पेपरलेस



बिलाचा पर्याय स्वीकारला तर त्यांना कागदी बिल पाठविणे बंद केले जाते व प्रत्येक बिलात दहा रुपये सवलत देण्यात येते.
त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्र्यांनी ई-ऑफिस प्रणालीचा संदेश दिला आहे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचा पर्यावरण रक्षणावर भर असतो.  ई-ऑफिस  प्रणालीमध्ये प्रत्यक्ष कागदाचा वापर न करता माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून पेपरलेस कामावर भर आहे. वीज ग्राहकांनी 'गो ग्रीन'च्या सवलतीचा लाभ घेतला तर छापील बिले कमी होऊन कागदाचा वापर कमी होईल व पेपरलेस कामाला चालना मिळेल तसेच पर्यावरणाचे रक्षण होईल.
'गो ग्रीन' योजनेचा आतापर्यंत राज्यातील तीन लाख ५६ हजार तर औरंगाबाद परिमंडलातील १६ हजार ७२८ ग्राहकांनी लाभ घेतला आहे. ज्या ग्राहकांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांना महावितरणच्या वेबसाईटवर जाऊन ग्राहक क्रमांक आणि बिलिंग युनिट ही माहिती भरून नोंदणी करता येते. महावितरणच्या मोबाईल ॲपवरूनही नोंदणी करता येते. नोंदणी करणाऱ्या ग्राहकाला 'ओटीपी' पाठविण्यात येतो. त्यामुळे नेमक्या संबंधित ग्राहकाकडूनच नोंदणी होत असल्याची खात्री होते. त्यानंतर ग्राहकाला त्याने दिलेल्या ई-मेल आयडीवर एक लिंक पाठवली जाते. लिंकवर क्लिक करून पडताळणी केली की प्रक्रिया पूर्ण होते. पुढच्या बिलापासून ग्राहकाला त्याची बिले ई-मेलने पाठविली जातात व कागदी छापील बिले बंद केली जातात. ग्राहकाला हवे तेव्हा त्याला ई-मेलने आलेल्या बिलाची प्रिंट घेता येते. त्यासोबत सर्वच ग्राहकांना त्यांच्या बिलाविषयी नियममाहिती देणारे 'एसएमएस'ही पाठविले जात आहेत.



# जामठी ते रवाळा व जामठी ते पिंपळा रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे

## सा.बां. विभागाचे दुर्लक्ष



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहर मराठवाडा- खान्देश सीमेला लागुन असलेला सोयगाव तालुक्यातील रस्त्यांची खूप दयनीय अवस्था आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामानंतरही तालुक्यातील एकही रस्ता दळणवळणासाठी चांगल्या स्थित नसल्याने तेथील जनतेला आपण अजूनही पारतंत्र्यात असल्याचे भासते. त्यातच अधिक पैसे कमावण्याच्या उद्देशाने ठेकेदाराकडून सुरू असलेली रस्त्याची कामे दर्जाहीन होत आहेत. तालुक्यातील जामठी ते पिपळा ८०० मीटर व जामठी ते रवळा सहा किलोमीटर स्त्याचे काम चालू सुरू आहे. रस्त्याची कुठलीही साफसफाई न करता तसेच रस्त्यावर डांबर न मारता रस्त्यावरती खडी अंथरण्यात आलेली आहे. या रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे होत असल्याने पावसाळ्यात रस्ता वाहून जाण्याच्या भीतीमुळे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. शासन या रस्त्यासाठी शासनाच्या लाखो रुपये खर्च करीत आहे. दरम्यान या रस्त्याच्या कामावर संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकही अधिकारी वा अभियंता साधा फिरकत नसल्याने या रस्त्याचे काम अतिशय खालच्या दर्जाचे व निकृष्ट होत आहे. कोणत्याही प्रकारची दबाई न करता व डांबराचा वापर न करतांना तसेच दबाई न करता रस्ता तयार होत आहे. रस्त्याचे काम निकृष्ठ व दर्जाहीन होत असल्यामुळे जामठी येथील ग्रामस्थ चरणसिंग नाईक विजय यांनी सांगितले.



# कन्नडमध्ये होमगार्ड स्थापनेचा 76 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहत साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे होमगार्ड स्थापनेचा 76 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहत साजरा करण्यात आला. होमगार्ड वर्धापनदिनानिमित्त होमगार्ड पथक कन्नड येथील डि.वाय.एस.पी.ऑफिस कार्यालय व ग्रामिण पोलिस स्टेशन येथे स्वछता मोहीम राबवन्यात आली. संचलन रैली काढण्यात आली. तसेच ग्रामिण रूग्णालय कन्नड येथील वरिष्ट वैदयकिय अधिकारी दिनेश राजपुत व आरोग्य कर्मचारी यांच्या उपस्थितीत रूग्णांना फळे व बिस्किट वाटप करण्यात आले. कार्यक्रम या वेळी कन्नड चे उप विभागीय अधिकारी मुकुंद आघाव, सह.पो. नि. तात्याराव भालेराव, पी.एस.आय. राजपूत, संजय आटोळे व होमगार्डचे ता समादेशक अधिकारी एन एस आदिक, अंशकालीन लिपीक डि.एम शिरसाट, शिरसे, पठाण, गायकवाड, थेटे, राठोड घटुरसिंग, काळे, श्रीमती आग्रवाल, औटे आदीसह होमगार्ड यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रहेमानिया कॉलनी येथील नागरिकांचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वार्ड क्रं.41, रहेमानिया कॉलनी व अल्तमश कॉलनी येथील नागरिकांनी नगरी समस्येच्या मागणीसाठी महापालिकेसमोर भिमशक्ती संघटनेच्या वतीने आमरण उपोषण केले. मनपा प्रशासकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे गल्ली नंबर 6 येथे सौ आबेदा बेगम गुलाब खान नगरसेविका असताना विकास कामे झाली होती. नेहमी रस्त्यावर दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असते. ड्रेनिजलाईन चोकअप होते. बदाम गल्लीची रस्त्याची चाळणी झाली तरीही मनपा प्रशासन दुर्लक्ष करत आहे. ड्रेनिजचे दुर्गंधीयुक्त पाणी नळाला येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. येथे धार्मिक स्थळ कुबा मस्जिद, इब्राहिम मस्जिद असल्याने नमाजला जाण्यासाठी लोकांना त्रास होत आहे. लवकर मनपा प्रशासनाने नवीन ड्रेनिजलाईन व सिमेंट कॉंक्रीटचा नवीन रस्ता बनवावा अशी प्रमुख मागणी उपोषणकर्ते यांनी केली आहे.



यावेळी माजी नगरसेवक संजय जगताप, माजी नगरसेवक इब्राहिम पटेल यांनी उपोषणाला पाठिंबा देत मागणी लवकर पूर्ण करुन नागरीकांना दिलासा देण्याची मागणी केली. भिमशक्तीचे दिनकर ओंकार, तय्यब पटेल, कुमार मगर, संतोष भिंगारे, विनोद कोरके, भाऊसाहेब नवगिरे, पंडीत नवगिरे, मधुकर नगराळे, राजु मंजुळे, कैलास जुमडे, सतिश नरवडे, शांतीलाल गायकवाड, सचिन भोले, प्रेम चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कैसर खान, शेख रफीक, रईस खान, शेख आसेफ, शेख आरेफ यांनी उपोषण केले.

# दरेगाव ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये शेतकरी विकास पॅनलचे सरपंच पदाचे उमेदवार

## सुदाम गायकवाड यांना जोरदार प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव ग्रामपंचायत निवडणुकीचा प्रचाराला वेग आला आहे 18 डिसेंबर रोजी ही निवडणूक होणार असून त्यात ठोसे गॅस नवसे मैदानात उतरले आहे प्रचारासाठी रॅली काढून घरोगारी जाऊन प्रचार करण्यासाठी उमेदवार प्यानल प्रमुख कार्यकर्ते कामाला लागले आहेत दरेगाव येथे सुदाम गायकवाड यांनी गावातील नवतरुण मंडळीस प्राधान्य देऊ येणाऱ्या ग्रामपंचायतिचे शेतकरी विकास पॅनल सर्व सदस्यांना विजयी करावे अशे आव्हान केले तसेच आपला ध्यास गावाचा विकास हे ध्येय समोर ठेऊन आपल्या गावाच्या विकासासाठी असल्याचा त्यांनी नमूद केले आमच्या शेतकरी विकास पॅनल मध्ये 9 सभासत असून त्यांना गावकर्यांनी एका मताने मतदान करावे जेणेकरून शेतकरी विलास पॅनल हे शेतकऱ्यांसाठी झटणारे असून गावाचा सर्वांगीण विकासासाठी पॅनल बहुमताने करावे असे पॅनल प्रमुख सुदाम गायकवाड यांनी सांगितले.



# लासुर स्टेशन येथे रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**लासुर स्टेशन :** छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, कर्मवीर भावराव पाटील या महापुरुषांबद्दल अपमानजनक बेताल वक्तव्य करणाऱ्या राज्यपाल भगतसिंग कोशारी, भाजपचे मंत्री चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, प्रसाद लाड, सुदांशु त्रिवेदी यांच्या विरोधात आज लासुर स्टेशन येथे रास्ता रोको करून भव्य निषेध मोर्चा जोडे मारो आंदोलन करण्यात आले. त्यांच्यावर अट्रोसिटी अँक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात याव, आशी मागणी आर पी आय, युवासेना, महिला आघाडी, एम आय एम, भीमशक्ती सर्व पक्षीय सामाजिक संघटना कार्यकर्त्यांच्या वतीने शिल्लेगाव ठाण्याचे पी आय मचिंद्र सुरवशे यांना करण्यात आले. यावेळी प्रशांत मुनवर आर पी आय जिल्हा उपाध्यक्ष तान्हाजी बनसोडे, जयदेव जाधव, अजित जाधव आर पी आय तालुका उपाध्यक्ष विक्रांत जाधव योगेश साळवे मयुर जैस्वाल, महिला आघाडी तालुका संघटक अर्चना सोमासे, जुनेद, शेख छोट्टू पठाण, शेलेश पगारे विकास पवार, गोतम शिरसाठ सुशील रनयेवले समीर शिरसाठ, राजेक सय्यद अमोल शेजवळ, रवि गायकवाड, इरफान बागवान शिवनाथ गायकवाड, अतीप शेख फारूख शेख, दिपक गायकवाड, रोहीत शिरसाठ, विनोद शिरसाठ, अजीज पठाण, संदिप घोडके, राहुल त्रिभुवन, रवि नरोडे, शिवसेना महिला आघाडीचे शोभाताई बनकर सुरेखाताई गायकवाड जमीला दीदी पठाण, विमलताई जगताप, शिल्पाताई नाडे, नंदाताई पगारे, ज्योती जोगदंड आदी उपस्तित होते.



# तंत्र शिक्षण हे स्वयंपूर्ण होण्याचे महत्त्वाचे साधन : डॉ. अभय वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक येथे तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद तर्फे स्कूल कनेक्ट उपक्रमांतर्गत विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबईचे संचालक डॉ. अभय वाघ यांच्या हस्ते करण्यात उद्घाटन तंत्र आले. यावेळी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाचे प्र. सहसंचालक डॉ. उमेश नागदेवे, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालयाचे उपसचिव श्री. अक्षय जोशी, छ.शाहू अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे व कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे हे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील विविध शाळेतील १० वि व १२ वि चे ५५० हुन अधिक विद्यार्थी, पालक शिक्षक तसेच मराठवाड्यातील विविध अभियांत्रिकी तसेच तंत्रनिकेतन मधील प्राचार्य व प्राध्यापक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी स्कूल कनेक्ट हि तंत्रशिक्षण विभागाची अतिशय यशस्वी मोहीम असून याद्वारे सर्व स्थरांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी उत्तम संधी असून तंत्रशिक्षणाची गरज व महत्व विद्यार्थी व पालकांना समजावून देण्यासाठी योग्य पर्याय असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाध्ये तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाचे प्र. सहसंचालक डॉ. उमेश नागदेवे यांनी स्कूल कनेक्ट या मोहिमेचा उद्देश हा विद्यार्थ्यांमध्ये तंत्र शिक्षणाविषयी जागृती निर्माण करून त्यांना भविष्यात स्वयंपूर्ण होण्यासाठी तंत्रशिक्षणाची आवड निर्माण व्हावी असा असल्याचे मत व्यक्त केले.

तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. अभय वाघ यांनी या कार्यक्रमामध्ये बोलताना तंत्रशिक्षण ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांमध्ये विविध स्वरूपाची कौशल्ये विकसीत करून त्यांना रोजगारक्षम बनवणे हा तंत्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश असल्याचे ठाम मत व्यक्त केले. देशाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी तसेच पायाभूत सोयी सुविधांमध्ये सुधारणा करून समाजपयोगी तंत्रज्ञान निर्माण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन डॉ. वाघ यांनी केले. सर्वच विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षणाची कास धरून आपले भविष्य उज्वल करावे असे जाहीर आवाहन त्यांनी विद्यार्थी व पालकांना केले. आजचा तरुण हा देशाचे भवितव्य ठरवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत असून आधुनिक तंत्रज्ञाच्या जोरावर जगातील अशक्य अशा बाबी शक्य करून सर्व अडचणीवर तोडगा काढण्यात यशस्वी होत आहे असे ठाम मत व्यक्त केले. स्कूल कनेक्ट या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व शहरातील तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च



दर्जाचे अतिशय कमी खर्चात शिक्षण घेणयासाठी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना उपलब्ध असून त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे अवाहन डॉ. अभय वाघ यांनी केले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबाबत छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख व प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी सर्व स्टाफ व विद्यार्थी यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विभागप्रमुख यामध्ये प्रा. अनिकेत सोनवणे, प्रा. संदीप मदन प्रा. सोनल बोराखडे, प्रा. हरीष रिंगे, प्रा. सचिन काकडे, प्रा. चंद्रशेखर रहाणे, प्रा. माधव नरंगले, प्रा. विजय शेळके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भरपूर परिश्रम केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कैलास तिडके यांनी केले तर प्रा. अनिकेत सोनावणे यांनी आभार मानले.

# थंडीत कुडकुडत झोपलेल्या निराधारांना मायेची ऊब

## धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या वतीने २०२३ ब्लॅकेट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** रस्त्यावर कुडकुडत झोपलेल्या निराधारांना धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून सतत चौथ्या वर्षी " मायेची उब " हा २०२३ ब्लॅंकेट वाटप उपक्रमाचा शुभारंभ नांदेडभूषण संतबाबा बलविंदरसिंघजी व भाजप जिल्हाध्यक्ष प्रवीण साले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला असून आगामी चाळीस दिवस दररोज मध्यरात्री नांदेड शहरातील विविध रस्त्यावर फिरून ब्लॅंकेट वितरित करण्यात येणार आहेत.

भाजपा महानगर नांदेड, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल व लायन्स क्लब नांदेड अन्नपूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने नगीनाघाट नांदेड येथे बाबाजींच्या हस्ते रथाची पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संयोजक दिलीप ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकातून हा उपक्रम घेण्यामागची भूमिका स्पष्ट केली.संतबाबा बलविंदरसिंघजी यांनी आपल्या भाषणातून दिलीप ठाकूर निरपेक्षपणे करत असलेल्या विविध सेवा कार्याचे कौतुक केले. प्रवीण साले यांनी मार्गदर्शन करताना ठाकूर यांच्या वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती दिली. लायन्स प्रादेशिक सचिव




योगेश जयस्वाल यांनी असे सांगितले की, यावर्षीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आणखी तेराशे ब्लॅकेटची आवश्यकता असल्यामुळे दानशूर नागरिकांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन केले. यावेळी बाळू खोमणे, जनार्दन ठाकूर,दिलीपसिंह सोडी, डॉ. सचिन उमरेकर, व्यंकट मोकले, अनिलसिंह हजारी, केदार नांदेडकर, राज यादव, सतीश सुगनचंदजी शर्मा, विक्रम टर्के पाटील, मारोती कदम, अनिल गाढे, सुवर्णा जहागीरदार, कैलास महाराज वैष्णव, कालूसिंघ भवानीवाले, आदित्य जहागीरदार, नरेश आलमचंदानी,नांदेडभूषण डॉ. हंसराज वैद्य, विजय गंभीरे ,अशोक धनेगावकर, प्रगती निलपत्रेवार या प्रमुखातिथींच्या हस्ते दोनशे गरजूंना ब्लॅंकेटचे वाटप करण्यात आले. लायंस अन्नपूर्णा अध्यक्ष अरुण काबरा, लायन्स सेंट्रल अध्यक्ष शिवा शिंदे, सुनील साबू,सविता काबरा, सुरेश शर्मा यांनी मोत्याची माळ देऊन सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवा लोट यांनी तर आभार कामाजी सरोदे यांनी मानले. सुमित्रा हेडगे, सुनंदा जाधव पांढरे, लक्ष्मीनिवासजी झंवर देगलूर, सुषमा नरसिंह ठाकूर, स्नेहलता जायस्वाल हैदराबाद, रेणुका सोनी, सीए संजय सितारामजी जाजू, मोहित जयप्रकाश सोनी,वसंत अहिरे, कु.अरुनिता आकाश झंवर, लिलादेवी सितारामजी जाजू,अभिलाषा मालपाणी, सुवर्णा जहागीरदार, शिवराज विंचुरकर, सुनिल काटकर, शरद वडजकर, प्रतीक पतंगे, योगेश जायस्वाल यांनी ब्लॅंकेट साठी देणगी दिलेली आहे. लुधियाना येथील कारखान्यातून घाऊक स्वरूपात ब्लॅंकेट मागण्यात येत असून एका ब्लॅंकेटचे वजन एक किलो पेक्षा जास्त आहे. एका ब्लॅंकेट ला रबर प्रिंटसह दोनशे रुपये शुल्क लागणार आहे.वीस ब्लॅंकेट साठी चार हजार रुपये खर्च येणार आहे. कमीत कमी वीस ब्लॅंकेट देणाऱ्या दात्यांचे नाव रबर प्रिंट द्वारे ब्लॅंकेट वर टाकून देणगीदारांच्या हस्ते वाटप करण्यात येणार आहे. समाज माध्यमाद्वारे ब्लॅंकेट देणाऱ्या दानशूर नागरिकांची यादी उपक्रम संपेपर्यंत दररोज प्रसिद्ध करण्यात येणार असून चाळीस हजार नागरिकापर्यंत पोंहचणार आहे. कार्यक्रमसाठी संतोष भारती,जगतसिंग ठाकूर,महेंद्र शिंदे, दिगंबर रूमने,नरसिंह द्रौपदीवार यांनी परिश्रम घेतले. मायेची उब हा उपक्रम राबवल्यामुळे एकाही निराधाराचा थंडीमुळे मृत्यू झाला नसल्याने दिलीप ठाकूर व त्यांच्या टीमचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# राईडच्या बहाण्याने बाईक चोरायचा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सोशल मीडियाच्या आधारे दुचाकी चोरीची शक्कल या चोरानं लढवली आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकला. सराईत दुचाकी चोरट्याला डोंबिवली पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. डोंबिवलीत घडली आहे. इंस्टाग्रामवर ओळख वाढवत भेटण्यास बोलवून राईडच्या बहाण्याने महागडी बाईक चोरून पसार झालेल्या चोरट्याला डोंबिवली पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अनिकेत वटकर असे या चोरट्याचे नाव असून तो सराईत बाईक चोर असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. अनिकेत विरोधात डोंबिवली, मानपाडा, ठाण्यातील कोपरी, कापूरबावडी पोलीस ठाण्यात बाईक चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तसेच त्याने आणखी काही दुचाकीने चोरी केल्याचा संशय पोलिसांना असून पोलीस त्या दृष्टीने पुढील तपास करत आहेत. याआधी अनिकेत रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या गाड्या चोरी करायचा. यावेळी मात्र त्याने ही नवीन शक्कल लढवली आणि तो पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

# 2 हजार रुपयांच्या नोटा गेल्या तरी कुठे


## ग्रामीण भागात चर्चा : बँका , एटीएममधूनही दर्शन नाही; प्रा.जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटाबंदीची घोषणा करीत जुन्या पाचशे, हजारांच्या नोटा चलनातून बाद ठरवत दोन हजारांची नवी नोट चलनात आणली . या घटनेला सहा वर्षांचा कालावधी लोटला . सुरुवातीच्या काळात दोन हजारांची नोट चांगल्या प्रकारे चलनात होती . सर्वसाधारणपणे इतर नोटा चलनात दिसत असल्या तरी ग्रामीण भागात दोन हजारांची नोट चलनातून गायब झाली आहे . त्यामुळे दोन हजारांच्या नोटा गेल्या तरी कुठे ? असा प्रश्न सर्वांना पडला आहे . दोन हजारांची नोट चलनात आल्यानंतर या नोटासुद्धा चलनात मोठ्या प्रमाणात दिसून येत होत्या . मात्र मागील अनेक महिन्यांपासून ग्रामीण भागात दैनंदिन व्यवहारात दोन हजारांच्या नोटा गायब झाल्या आहेत . त्यामुळे आर्थिक व्यवहार करताना अनेक अडचणी येत आहेत. बँकेच्या दैनंदिन व्यवहारातसुद्धा ग्राहकांना ५००, २०० , १०० , ५० रुपयांच्या नोटा दिल्या जात आहेत . दोन हजारांची नोट बाजारात दिसत नसल्यामुळे या नोटा बाजारातून गेल्या तरी कुठे ? असा प्रश्न नागरिकांना सतावत आहे. चलनातून गायब झालेल्या या नोटा एटीएममधूनही दिसेनाशा झाल्या आहेत. ग्रामीण भागातील अनेकांनी दोन हजारांची नोट काही महिन्यांपासून बघितली नसल्याचे सांगितले जाते . तर व्यापारी वर्गालाही दोन हजारांची नोट व्यवहारात येत नसल्याने व्यवहार करताना अडचणी येत आहेत . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काळाबाजार थांबविण्याच्या उद्देशाने नोटबंदी घोषित केली होती. या निर्णयाविरोधात तीव्र संतापही व्यक्त करण्यात आला. यामुळे अर्थव्यवस्थेवरही याचा परिणाम झाला होता. मात्र आता चलनातूनच दोन हजारांची नोट गायब झाल्यामुळे सदर नोट गेली कुठे ? याबाबत ग्रामीण भागात चर्चेला उधाण आले आहे.




**एटीएममधूनही हद्दपार**
केंद्र सरकारने नोटाबंदी जाहीर केल्यानंतर पाचशे व हजार रुपयांच्या नोटा बाद केल्या होत्या . त्यावेळी दोन हजार रुपयांची नोट चलनात दाखल करण्यात आली होती . मात्र अवघ्या सहा वर्षांच्या कालावधीतच दोन हजारांची नोट चलनातून गायब झाली आहे . विशेष म्हणजे ग्रामीण भागातील बँक व एटीएममधूनही ही नोट हद्दपार झाल्याचे चित्र आहे .
**प्रा .जीवन कोलते ( सामाजिक कार्यकर्ते )**
**सावळदबारा ता सोयगाव**

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in